TIGHT BINDING BOOK

ॐ तत्सत्

# भारतीय तत्त्वज्ञानप्रकाश

म्हणजे

# मानवनीतिशास्त्र

भाग १ ला



लेखक

लक्ष्मण गणेश बापट

UNIVERSAL
LIBRARY
OU_196074
UNIVERSAL
LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M181.4/B22Bb Accession No. M4431

Vol. I

Author बापट, लक्ष्मण गणेश.

Title भारतीय ...नीतिशास्त्र. 1954

This book should be returned on or before the date last marked below.

ॐ तत्सत्

श्रीसद्गुरवेनमः

# भारतीय तत्त्वज्ञानप्रकाश

म्हणजे

# मानवनीतिशास्त्र

भाग १ ला

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ १ ॥
(गी. ६-५)




लेखक

**लक्ष्मण गणेश बापट,**

पेन्शनर हेडपोष्टमास्तर, विजापूर.

"श्रीरामानंद बीडकरमहाराज यांचें चरित्र", "विचार-जागृति",
"आत्मसाक्षात्कार-मार्गप्रदीप" वगैरे पुस्तकांचे कर्ते.



शके १८७६ ] आवृत्ति पहिली [ सन १९५४

किंमत बारा आणे

हें पुस्तक जो कोणी सतत वाचनांत ठेवील त्याला सुख आणि शांति प्राप्त करून घेण्याचा मार्ग सांपडेल.

## — ग्रंथार्पण —

हें पुस्तक श्रीसद्‌गुरु **रामानंद बीडकर महाराज**
यांचे प्रेरणेनें व आशीर्वादानें
लिहिलें गेलें आहे;
तें जनताजनार्दनाला अर्पण.

आश्विन शुद्ध १० ( दसरा )
गुरुवार, शके १८७६
तारीख ७-१०-१९५४

लेखक

सर्व हक्क प्रकाशकानें आपल्याकडे ठेविले आहेत.

प्रकाशक
लक्ष्मण गणेश बापट,
श्रीबीडकर महाराज मठ,
२४५ शनवार, पुणें २.

मुद्रक
माधव पर्वतराव तळेकर,
श्रीदत्त मुद्रणालय,
३३५ शनवार पेठ, पुणें २.

॥ श्रीसद्गुरवे नमः ॥

## भारतीय तत्त्वज्ञानप्रकाश

# प्रास्ताविक दोन शब्द

हा एक योगायोगच म्हटला पाहिजे. सन १९५१ च्या नाताळामध्यें येथें भारतीय तत्त्वज्ञानपरिषद भरली होती. त्यांत वाचला जावा म्हणून "भारतीय तत्त्वज्ञानसार" हा एक अति छोटा निबंध आमच्याकडून सूत्रवत् लिहिला गेला होता; पण तो इंग्रजींत नसल्यामुळें त्या वेळीं तो तेथें वाचला गेला नाहीं. आतां आम्ही तो मराठींत व इंग्रजींतहि पृथक् पृथक् लहान पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहों; पण तो अगदीं सूत्रवत् असल्यामुळें वाचकांना त्याचा यथातथ्य उपयोग व्हावयाचा तर त्याचें सोपें स्पष्टीकरण त्याबरोबरच असल्याशिवाय त्याचा प्रस्तुत कांहीं विशेष उपयोग होणार नाहीं असें दिसत असल्यामुळें हा "भारतीय तत्त्वज्ञानप्रकाश भाग १ ला" हा आमचा त्याला पूरक असा मोठा निबंध आम्ही प्रसिद्ध करीत आहों. हा निबंध म्हणजे त्या छोट्या निबंधाचें सोपें स्पष्टीकरण होय.

पण हा निबंधहि त्या निबंधाचें पूर्ण स्पष्टीकरण होऊं शकणार नाहीं. कारण ह्यांत फक्त आजच्या परिस्थितींत जेवढें लोकांना उपयुक्त होईल तेवढेंच स्पष्टीकरण करण्याचें ठरवून भारतीय तत्त्वज्ञानप्रकाशाचा हा पहिला भाग आम्ही प्रथम प्रसिद्ध करीत आहों.

कोणताहि आचारधर्म हा त्यांतील तत्त्वज्ञानावर आधारलेला असतो; पण भारतांतील तत्त्वज्ञानांतहि वेळोवेळीं मतभेद उत्पन्न होऊन कोणालाहि राजाश्रय न मिळाल्यामुळें ज्याला जो आज सुखावह दिसेल तोच त्याचा धर्म होऊन बसला आहे व कित्येक नवमतवादी तर लोकमान्यांनीं जसा 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असें जाहीर केलें, तद्वतच सुख प्राप्त करून घेणें हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तें मी प्राप्त करून घेणारच असें म्हणूं लागले आहेत.

सन १८९२ ते ९९ पर्यंतचें माझें आयुष्य अत्यंत कष्टांत व दुःखांत गेलें. तें इतकें कीं, मला जर एका सज्जन मनुष्याची संगति मिळाली नसती तर मीं कदाचित् आत्महत्याहि केली असती.

अशा ह्या दुर्धर कष्टप्रद स्थितींत मलाच असें दुःख कां व्हावें, तसेंच जगांत एक सुखी तर एक दुःखी अशी न्यायी ईश्वराच्या राज्यांत विषमता कां हे विचार सारखे माझ्या मनांत घोळत असतां ज्याचें त्याचें ' दैव ' असें मला उत्तर मिळत असे. म्हणून हें खडतर दैव माझ्या अगदीं प्रथमच्याच जन्मांत आलें कोठून व सुखाकरतां म्हणून हातचें सुख सोडून अचानक दुःखांत येऊन कां पडलों याचें कारण शोधण्यांत माझ्या मनानें मला अगदीं भंडावून सोडलें.

अशा परिस्थितींतच आमचे गुरु श्रीरामानंद बीडकरमहाराज यांची गांठ पडून त्यांनीं मला हाताशीं धरलें व त्यांच्या आशीर्वादानेंच माझे सर्व संशय दूर झाले. भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे काय चीज आहे तें आतां मला स्वानुभूतीनें कळलें आहे. त्याचा लाभ मराठी वाचकांना

मिळावा म्हणून ते समाधिस्थ झाल्यावर १३-१४ वर्षांनीं मी त्यांचें चरित्र लिहिलें व पुढें ८-९ वर्षांनीं ' विचार-जागृति ' हें पुस्तक लिहिलें. त्यांत मनुष्याला हतबुद्ध करणारे असे अनेक गूढप्रश्न कार्य-कारणपद्धतीनें हल्लींच्या बुद्धिवादी मनुष्याला पटतील अशारीतीनें सोडविले आहेत. त्याचीहि थोडीशी माहिती शेवटीं दिली आहे.

नंतर दुसरेहि अडीच-अडीचशें पानांचे दोन-तीन ग्रंथ लिहून ठेविले आहेत; पण द्रव्याअभावीं आज ७-८ वर्षें ते कपाटांत पडून राहिले आहेत. असो.

प्रथमच सांगिल्याप्रमाणें " भारतीय तत्त्वज्ञानसार " हा आमचा अति छोटा निबंध मराठींत व इंग्रजींत आणि त्याचेंच हा " भारतीय तत्त्वज्ञानप्रकाश ( स्पष्टीकरण ) भाग १ ला " म्हणून प्रसिद्ध करीत आहों.

पूर्वींचे आमचे दोन ग्रंथ मोठे असल्यामुळें ते घेण्याची व वाचण्याचीहि ताकद आज लोकांमध्यें उरलेली नाहीं. म्हणून अगदीं थोडक्यांत लहान लहान भागांत भारतीय तत्त्वज्ञान वाचकांपुढें ठेवण्याचा आमचा हा प्रयत्न आहे. आमचें वय सध्यां ८१ वर्षांचें असून आमच्या डोळ्यादेखत एवढें तरी कार्य व्हावें अशी इच्छा आहे. काय सद्गुरु घडवून आणतील तें खरें, कारण मी फक्त लेखक आहे. एवढें मोठें जबाबदारीचें काम करण्याची मला स्वतःला ताकद नसल्यानें मी लेखणी खालीं ठेवलीहि होती; परंतु प्रथम स्वराज्य मिळावें म्हणून व पुढें स्वराज्याचें सुराज्य व्हावें म्हणून जी आम्हांला सारखी तळमळ

लागून राहिलेली आहे त्यामुळेंच हें काम पुन्हा हातीं घ्यावें लागलें आहे. हा केवळ आरंभ आहे.

हें काम हातीं घेण्याचें दुसरें मुख्य कारण म्हणजे देहच मी व या देहाचें सुख तेंच खरें सुख असें समजून आज सर्व लोक मनाचे दास म्हणजे गुलाम झाले आहेत. त्या गुलामगिरींतून त्यांची सुटका व्हावी व बाबानों ! मनाला चालना देणारा जो ईश्वर तो तुमच्या हृदयांत, बुद्धींत म्हणजे तुमच्याजवळच आहे, त्याला ओळखा आणि त्याचे गुण अंगीं आणून ईश्वरासारखें वैभवी व सुखी होण्याकरितां धर्मानें ( मानवनीतीनें ) वागाल तर याच देहांत व याच जन्मीं सुखी व्हाल.

स्वराज्य मिळविण्याकरितां हजारों लोकांनीं प्राण खर्चीं घातले व राहाण्याला भूमि मिळविली, आतां सुखाकरितां द्रव्य मिळविण्याची खटपट सुरू आहे; पण हें सामाजिक म्हणजे समाजाचें काम राज्यसंस्थेकडूनच होण्यासारखें आहे, तें एखाद-दुसऱ्या व्यक्तीकडून होण्यासारखें नाहीं; पण व्यक्ति-व्यक्तीनेंच समाज बनत असतो हेंही तितकेंच खरें आहे. म्हणून आपल्या घरींच प्रथम मानवनीतीनें वागण्यास सुरुवात करून प्रापंचिक सुखच प्रथम प्राप्त करून घ्यावें म्हणजे सामाजिक सुख कसें मिळवावें तें आपोआपच कळूं लागेल; पण त्याकरितां मनुष्याला प्रथम मानवनीति म्हणजे काय तें समजलें पाहिजे. तें समजावें म्हणून आमचा हा प्रयत्न आहे. मानवनीति म्हणजे काय याचें स्पष्टीकरण म्हणजेच हा ‘ भारतीय तत्त्वज्ञानप्रकाश ’ होय.

ही मानवनीति म्हणजे मानसिक रोग बरें करण्याचें शास्त्र आहे.

मन निरोगी राहिलें तर शरीर निरोगी राहील व शरीर निरोगी राहिलें तर मन निरोगी होण्यास मदत होईल. म्हणून आमचा हा भारतीय तत्त्वज्ञानप्रकाश निबंध वाचून व त्याचें मनन करून प्रथम देह व मन निरोगी करा म्हणजे समाजांत नीतिधर्मानें कसें वागावें तें समजेल व हजारों लोकांनीं प्राण खर्ची घालून मिळवून दिलेल्या स्वराज्याचें सुराज्य होण्यास मदत केल्यासारखें होईल व भारत म्हणजे सुख आणि शांति मिळविण्याचा एक आदर्श होऊन राहील. इतकेंच नव्हे तर तो जगाचाच गुरु होईल.

वरील विवेचन मी सामान्य मनुष्य सांगत नसून आमचे त्रिकालज्ञ गुरु श्रीबीडकरमहाराज यांचे बैठकींत जो सारखा खल चालत असे त्याचें सार आहे. जगांत सुख आणि शांति कशी नांदेल या प्रश्नास त्यांनीं जें सिद्धांतरूपानें सांगितलें तें मी अगदीं सूत्ररूपांत थोडक्यांत खालीं देतों.

पुरुषार्थ साधणें हें मनुष्याचें श्रेष्ठ कर्तव्य आहे. तो साधून मनुष्यानें मनुष्य-जन्माचें सार्थक करून घ्यावें. त्यानें मनुष्य नराचा नारायणसुद्धा होईल; पण पुरुषार्थ साधतांना एक मोठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो पुरुषार्थ चतुर्विध असावा. द्विविध नसावा. चतुर्विध पुरुषार्थ उन्नतीला नेणारा तर द्विविध पुरुषार्थ अधोगतीला नेणारा आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष याला धरून कर्म करणें तो चतुर्विध पुरुषार्थ व धर्म आणि अर्थ याला धरून कर्म करणें तो द्विविध पुरुषार्थ. जगांत अशांतता नांदण्याचें मूळ या द्विविध पुरुषार्थांत आहे.

कोणतेंहि राष्ट्र आज कितीहि भरभराटींत किंवा वैभवांत दिसत असो, साम्राज्यशाहीचेंहि असो, त्यांतील आचारधर्म जर द्विविध पुरुषार्थावर आधारलेला असेल तर त्यांत कधींहि शांतता नांदणार नाहीं व केव्हां ना केव्हां तरी त्याचा अध:पात होणार हें अगदीं निश्चित ! असें आमच्या गुरुमहाराजांचें स्पष्ट सांगणें असे.

गोकुळाष्टमी शके १८७६ }
तारीख २०।८।५४ }

लेखक.

---

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठें |
|---|---|
| प्रकरण १ लें—भारत धर्माची रूपरेषा—विषय प्रवेश | १-९ |
| प्रकरण २ रें—भारत धर्माचीं मूलतत्त्वें | १०-१७ |
| प्रकरण ३ रें—विश्वधर्म म्हणजे मानवनीति | १८-३० |
| प्रकरण ४ थें—मानवनीतीचें स्पष्टीकरण | ३१-५६ |
| धर्माचें प्रत्यक्ष ज्ञान कसें संपादावें | ३१-३७ |
| विश्वधर्माचें विशेष स्पष्टीकरण | ३८-४१ |
| मनोराज्याची विशिष्ट पहाणी | ४२-४३ |
| पांच मूलतत्त्वें व दहा प्रकारचे अधर्म | ४४-४५ |
| सूड भावना कशी नष्ट होईल ? | ४६-४८ |
| मन व बुद्धि | ४९-५२ |
| धर्म व ईश्वर | ५३-५५ |

श्रीसद्गुरवे नमः ।

# भारतीय तत्त्वज्ञानप्रकाश म्हणजे मानव नीतिशास्त्र

प्रकरण १ लें

## भारत धर्माची रूपरेषा

यो यथा वर्तते यस्मिन् तस्मिन्नेवं प्रवर्तयन् ।
ना धर्मं समवाप्नोति न चाश्रेयश्च विन्दति ॥ १ ॥

(म. भा. उद्योग. १७९-३०)

" आपल्याबरोबर जो जसा वागतो तसें त्याच्याशीं आपण वर्तन केल्यानें अधर्म म्हणजे अनीति घडत नाहीं आणि अकल्याणहि होत नाहीं."

### विषयप्रवेश

तत्त्वज्ञानापूर्वी भारत धर्माचा अनादिकालापासून विचार करूं लागलों तर भारत धर्माचीं जरी अनेक स्थित्यंतरें दिसत असलीं तरी तो घड्याळाच्या लंबकाप्रमाणें प्रवृत्ति-निवृत्तीकडे सारखा हेलकावे खात होता असें दिसतें, व प्रत्येक वेळीं निरनिराळे धर्मपंथ उत्पन्न होऊन सांख्य, वेदान्त, मीमांसा वगैरे निरनिराळीं षड्शास्त्रेंहि निर्माण झालीं. त्या सर्वांची एकवाक्यता करून प्रवृत्ति-निवृत्तीला सारखाच उपयोगी पडेल असा गीताधर्म अस्तित्वांत आला; पण कृष्णनिर्याणानंतर

कलिप्रभावामुळें भगवंतांनीं व व्यासोनारायणांनीं प्रस्थापित केलेला हा गीताधर्म फार दिवस टिकला नाहीं.

बौद्ध अवतारापर्यंतच्या मधल्या सुमारें अडीच हजार वर्षांचा साद्यंत इतिहास भारत इतिहासाप्रमाणें प्रत्यक्ष उपलब्ध नसला तरी त्या वेळीं प्रवृत्तीचें बंड अगदीं परमोच्च कोटीला गेलें असावें आणि म्हणूनच भगवंताला बौद्धावतार घेऊन जनसमाजाला निवृत्तीकडे ओढावें लागलें; पण पुढें कालाच्या ओघांत जनसमाज केवळ निवृत्तीच्याहि इतका परमावधीला गेला कीं, हजारों बौद्धभिक्षु व भिक्षुणी यांनीं त्यांचे त्या वेळचे सर्व विहार भरगच्च भरले जाऊन ते केवळ पोकळ निवृत्तीचें माहेरघर बनले होते. साहजिकच जनसमाज पुढें प्रवृत्तीकडे वळूं लागला. तरी जैन व बौद्ध यांनीं वेदाला झुगारून देऊन अरण्यवास व संन्यास यांसच जास्त महत्त्व दिलें. त्यामुळें वैदिक धर्मावर मोठेंच संकट ओढवलें होतें; पण कुमारीलभट्ट व मंडनमिश्र आदि करून कर्ममार्गी लोकांनीं वेदांतील कर्ममार्गाचें पुनरुज्जीवन करून बौद्धमताचा पाडाव केला, परंतु त्याबरोबरच कर्ममार्गाचेंहि त्यांनीं जास्तच स्तोम माजविलें.

एवंच नाना मतें व नाना पंथ यांनीं धर्माची घडी बिघडून बौद्ध धर्माच्या प्रसारामुळें वैदिक धर्मावर जेव्हां मोठेंच गंडांतर आलें तेव्हां वैदिक धर्माचा ऱ्हास थांबविण्याकरितां व वेदांतील कर्मकांडाचें स्तोम नाहींसें करण्याकरितां श्रीशंकरांना शंकराचार्यरूपानें अवतीर्ण व्हावें लागलें. त्यांनीं नास्तिकवाद खोडून काढून कर्ममार्गाला आळा घालण्याकरितां संन्याशाश्रमाचें पुनरुज्जीवन केलें व खऱ्या निवृत्ति व प्रवृत्तिमार्गी लोकांनाहि पुढील अद्वैत सुखाचा मार्ग दाखविण्याकरितां "अद्वैत सिद्धान्त व मायामिथ्यात्ववाद" त्यांना प्रस्थापित करावा

लागला. त्यानें नास्तिक बौद्ध मताचें उच्चाटन झालें व वैदिक धर्माचा ऱ्हास थांबला.

याप्रमाणें आचार्यांनीं आठवे शतकांत अद्वैत सिद्धान्त व माया-मिथ्यात्ववाद व जीव-ब्रह्म ऐक्य या तत्त्वज्ञानावर दिग्विजय करून सर्व द्वैती मतांत एकसूत्रीपणा आणला तरी त्याला राजाश्रय होता तोंपर्यंतच तें टिकलें.

या अद्वैत मतांतच पुढें विशिष्टाद्वैत, द्वैत, शुद्धाद्वैत वगैरे द्वैती मतें उत्पन्न झालीं, पण तींहि खऱ्या अर्थानें ग्रहण करण्याचें सामर्थ्य जनतेंत उरलें नसल्यामुळें त्यांचा योग्य उपयोग न होता सांप्रदाया-सांप्रदायांतच वाद उपस्थित होऊन पुढें शैव व वैष्णव असे दोन पंथ उत्पन्न होऊन ते आज एकमेकांचे शत्रु होऊन बसले आहेत. पण कोणालाच राजाश्रय न मिळाल्यामुळें सामाजिक आचारधर्माला ते साह्यभूत झाले नाहींत. तरी जनतेनें धर्म सोडला नव्हता.

तसेंच यावनी अमलाखालीं भारत जरी बरींच वर्षें पारतंत्र्यांत होता तरी जनतेंतील ईश्वर-भावना जागृत असल्यामुळें धर्म श्रद्धेनें पाळला जाऊन त्याच्या जोरावरच भारताला स्वातंत्र्य प्राप्त झालें व तें कांहीं वर्षें टिकलेंहि.

मानवी जीवाचें इहपरलोकींचें जीवन सुखावह होण्याकरतां धर्म पाहिजे. धर्म रक्षणाकरितां राजसंस्था पाहिजे व दोघांचेंहि रक्षण होऊन स्वास्थ्य नांदण्याकरतां लोकांमध्यें ईश्वरी भावना जागृत असली पाहिजे.

वैय्यक्तिक व सामाजिक आचारधर्महि कालपरत्वें परिस्थित्यनुरूप बदलत असतो. त्याप्रमाणें धर्माचें पुनरुज्जीवन राजसंस्थेकडून वेळो-वेळीं होत गेलें नाहीं तर स्वधर्महि दुःखप्रद होतो. त्यामुळें जनता आचारविचारभ्रष्ट होऊन पुढें धर्महि लयाला जातो.

भारतानें यावनी अंमलापासून धर्माच्या जोरावर स्वराज्य मिळविलें तरी धर्माचें पुनरुज्जीवन होऊन त्याला स्थैर्य प्राप्त होण्यापूर्वींच पाश्चात्य लोकांच्या स्वाऱ्या होऊन भारत इंग्लिश अंमलाखालीं परतंत्र झाला व भारतांतील राज्यव्यवस्थेंत व सामाजिक व्यवस्थेंतहि विरुद्ध संस्कृतीच्या शिक्षणानें इतकें परिवर्तन झालें कीं, राजकारणी लोकहि जडवादानें भारले जाऊन देव व धर्म याला आज अगदींच पारखें झालेलें आहेत.

भारताला जें आज स्वातंत्र्य मिळालें आहे तें धर्माच्या जोरावर मिळालें नसून संघशक्तीच्या शांतता मार्गानें किंवा दहशतवादानें तें मिळालें असें राजकारणी पुरुष समजत आहेत.

पाश्चात्य राष्ट्रांतील राज्यक्रांत्या दहशतवादानें घडून आल्या असून दहशतवादी कायद्यांनींच त्या आज टिकवून धरण्यांत येत आहेत असें भारताला दिसत असल्यामुळें त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून ( त्यांना गुरुस्थानीं मानून ) मिळालेलें स्वातंत्र्य टिकविण्याचा भारत प्रयत्न करीत आहे; पण पाश्चात्य राष्ट्रांतहि शांतता नांदत नसून ती कशी नांदेल या फिकिरींतच तीं राष्ट्रें आज मार्ग शोधीत आहेत व निरनिराळे प्रयोग करून पाहात आहेत, अशा वेळीं आपणहि तेच प्रयोग करीत बसणें हिताचें होणार नाहीं. स्वातंत्र्यशक्ति भलतीकडेच खर्च केल्यासारखें होईल.

स्वातंत्र्ययुद्धानंतर भारतांत तरवारीनें राज्य राखण्यापेक्षां लेखणीनें राज्य राखणें सोईचें होईल असा निर्णय घेऊन इंग्लिशांनीं सर्व हिंदुस्थानभर इंग्रजी शिक्षण सुरूं केलें व आमच्यांतील धर्म व ईश्वर-भावना समूळ नष्ट करून टाकली. त्यामुळें भारताचें तत्त्वज्ञान व त्यावर आधारलेला धर्म याला आम्ही पूर्ण पारखें झालों व आम्ही

म्हणजे आमच्यांतील सुशिक्षित लोक इंग्रजी सुधारणांनीं भारले जाऊन स्वातंत्र्य मिळवावयाचें तें पूर्वीप्रमाणें धर्मांच्या जोरावर न मिळवितां युरोपांतील दहशतवादावर मिळविण्याचा त्यांतील कांहीं लोकांनीं प्रयत्न केला.

भारताला आज स्वातंत्र्य मिळालें आहे तें अहिंसात्मक सत्याग्रहानें, दहशतवादानें किंवा दुसऱ्या कशानेंहि मिळालेलें असो, तें कसें टिकवावयाचें हाच प्रश्न आज आपल्यांतील विचारी लोकांपुढें आहे.

समाजधारणा धर्मानें होते, धर्माचें रक्षण राज्यसंस्थेकडून होतें, व राजा व प्रजा यांतील स्वास्थ्य त्यांच्यामध्यें ईश्वरी भावना जागृत असते तोंपर्यंत तें टिकतें. असें भारत धर्माचें मुख्य तत्त्व आहे. पण विरुद्ध संस्कृतीच्या इंग्रजी शिक्षणानें भारतांत जडवाद पसरून धर्म, राज-संस्था व ईश्वरभावना यांत इतकी क्रांति झाली आहे कीं, " धर्म म्हणजे राष्ट्रधर्म, आणि राष्ट्रधर्म म्हणजे ज्यांत इंद्रियजन्य सुखाची अनिर्बंध चंगळ असेल व जो व्यक्तिस्वातंत्र्यावर कसलेंहि बंधन घालीत नसेल तोच श्रेष्ठ राष्ट्रधर्म " असा आज प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांत तरी दृढ समज होऊन बसला आहे व जडवादी लोकांना तर ईश्वर हा शब्द अगदींच पारखा झाला आहे.

या राष्ट्रधर्माच्या प्राप्तीकरितां प्रत्येक राष्ट्राचे विश्वप्रयत्न चालले आहेत व कित्येकांनीं तर धर्म व ईश्वरभावना यांना झुगारून देऊन ते शब्दहि त्यांच्या भाषेंत कोणाला आज आढळणार नाहींत. त्यामुळें पृथ्वीवर वर्णद्वेष, जातिकलह व जाती नसतील तर वर्गकलह उत्पन्न होऊन लढाया, युद्धें, महायुद्धें व पुढें संप व पक्षोपपक्ष उत्पन्न होऊन त्याचे परिणाम हरएक बाबतींत इतके कष्टप्रद झाले आहेत कीं प्रजा अगदीं संत्रस्त झाली आहे. त्यांला कारण प्रस्तुतचा राष्ट्रधर्म होय.

कोणत्याहि स्वतंत्र राष्ट्रांत स्वास्थ्य नांदून तें टिकण्याकरतां व सर्व प्रजेच्या धारण-पोषणाकरतां धर्माची आवश्यकता असते; हें तत्त्व खरें असलें तरी भारत बहुतकालपर्यंत पारतंत्र्यांत असल्यामुळें निरनिराळ्या धर्मांच्या, जातीच्या व पंथाच्या आणि विरुद्ध संस्कृतिच्या लोकांची वस्ती या देशांत कायमची स्थायिक झाल्यामुळें व प्रत्येकाचे आचार-धर्म व रीतिरिवाज निरनिराळे असल्यामुळें धर्माच्या नांवाखालीं सर्वांना एका सूत्रांत आणणें स्वतंत्र भारताला अशक्य झालें आहे.

तसेंच आधुनिक यांत्रिक युगांत वाहतुकीच्या निरनिराळ्या साधनांनीं पृथ्वीवरील स्वतंत्र राष्ट्रें व निरनिराळे प्रदेश यांतील लोकांमध्यें व्यापार व दळणवळण बेसुमार वाढल्यामुळें भारतासारख्या नवोदित स्वतंत्र राष्ट्राला आपल्याच धर्माप्रमाणें इतरांना वागविणें शक्य नसल्यामुळें आमचें राष्ट्र निधर्मी आहे असें भारताला आज जाहीर करावें लागलें आहे.

सर्व राष्ट्रांतील अशांतता नाहींशी करून शांतता प्रस्थापित करण्याकरतां **युनो**मार्फत जगड्व्याळ प्रयत्न सुरू आहेत, पण भांडवल-वाले श्रीमंत लोक व साम्यवादी वगैरे मजूर लोक यांच्यामध्यें परस्पर विरोधी ध्येयें वसत असल्यामुळें व व्यक्तिस्वातंत्र्य अनिर्बंध वाढल्यामुळें युनोलाहि शांतता प्रस्थापित करणें अशक्य झालें आहे.

अशा वेळीं भारतानें दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्यापेक्षां भारत धर्माचें मूळ शोधून त्या मूलतत्त्वावर आधारलेला धर्म आज भारतांत कसा प्रस्थापित करतां येईल याकडेच लक्ष पुरवणें प्राप्त आहे.

मैथुनजन्य सृष्टि अस्तित्वांत आल्यापासूनच मनुप्रणीत भारत धर्माचीं पांच मूलतत्त्वें अस्तित्वांत आलेलीं असून त्या मूलतत्त्वावर आधारलेले दहा अधर्म आहेत. ते टाळून नीतिधर्माप्रमाणें वागणें यालाच भारत

धर्म असें म्हणतात. त्यांत इतर राष्ट्रांप्रमाणें भारताचा म्हणून निराळा राष्ट्रधर्म नाहीं.

हीं आद्य मूलतत्त्वें ज्या काळीं ठरलीं गेलीं त्या वेळीं सर्व मानवी जीव म्हणजे एक मानव जात असें धरून सर्व मानव जातीच्या हिता- करतां म्हणून तीं ठरलेलीं आहेत. म्हणून त्याला आम्ही विश्वधर्म असें म्हणतों व त्या नांवानेंच तो भारतांत प्रस्थापित करावा लागेल. म्हणून आज भारतांत निरनिराळे धर्म, पंथ, जाति व संस्कृति यांचे लोक एका ठिकाणीं वावरत असले तरी कोणालाहि आपला स्वतःचा राष्ट्र- धर्म म्हणून इतरांशीं तसें वागण्याचा हट्ट धरून चालणार नाहीं. स्वतंत्र राष्ट्राचा जो धर्म असेल तो सामाजिकरीत्या तरी पाळावाच लागेल, पण धर्म म्हटला कीं हट्टवादीपणा जोरांत पुढें येतो म्हणून भारतांत आज कोणचाहि नवा धर्म प्रस्थापित करावयाचा नसून सृष्टिधर्माप्रमाणें वागण्याची जीं आद्य मूलभूत तत्त्वें आहेत तीं पाहून व त्याप्रमाणें त्यावर आधारलेलें नीतिशास्त्र तयार करून 'प्रत्येक मानवी जीवानें इतर जीवांशीं आत्मौपम्य बुद्धीनें म्हणजे जसा आपला प्राण तसाच दुसऱ्याचा हें लक्षांत बाळगून इतरांशीं कसें वागावें' याचें नीतिशास्त्र बनवून तें लोकांना प्रथम शिकविलें पाहिजे, तरच स्वराज्याचें सुराज्य होईल.

केव्हांहि झालें तरी देशकालपरिस्थित्यनुरूप धर्माचें पुनरुज्जीवन करावें लागतें. तशी वेळ आज भारताला प्राप्त झाली आहे. ह्या वेळीं राजकारणांत तरी कोणीच आपल्या धर्माचा हट्ट चालवूं नये म्हणून भारतानें आमचें राज्य 'निधर्मी' आहे असें जाहीर केलें आहे. शिवाय धर्म म्हणजे राष्ट्रधर्म डोळ्यापुढें उभा राहून त्यानें उडविलेला रक्तपाती कहर प्रत्यक्षच डोळ्यापुढें दिसत असल्यामुळें आतां जें धर्माचें पुनरु-

जीवन करावयाचें त्यांत धर्म हा शब्द न घालतां " मानवनीति " असा शब्दप्रयोग उपयोगांत आणावा लागेल. इतकी जनतेमध्यें धर्म शब्दानें चीड उत्पन्न झाली आहे. म्हणून आतां जें धर्माचें पुनरुज्जीवन व्हावयाचें तें ' एका मानवी जीवानें इतर जीवांशीं आत्मौपम्य बुद्धीनें वागण्याचे नियम म्हणजे नीति किंवा मानवनीति.' या नांवानें झालें पाहिजे. आतां शाळेंत धर्म शिकवावयाचा तो कोणाचाहि विशिष्ट राष्ट्रधर्म नव्हे, तर नीति किंवा मानवनीतिशास्त्र होय.

मानवनीति या नीतिशास्त्रांतहि मतभेद होणें शक्य आहे व धर्म शब्द गेला तर भारतवासीयांना तें कदाचित् आवडणारहि नाहीं, म्हणून याला विश्वधर्म असेंहि नांव देतां येईल. **विश्वधर्म** म्हणजे पृथ्वीवरील सर्व मानवजातीचा धर्म होय. पण त्याचा प्रयोग प्रथम भारतांतच करावयाचा असल्यामुळें आमच्या देशांत तरी इतरांना लुडबुड करतां येणार नाहीं. शिवाय हा विश्वधर्म म्हणजे मानवनीति असल्यामुळें सर्व मानवी जीवांना मग ते कोणत्याहि राष्ट्रधर्माचे असोत, आपण मनुष्य आहों हें दाखविण्याकरतां प्रत्येक मनुष्याला प्रथम मनुष्यत्वानें वागावें लागेल.

या विश्वधर्माचीं म्हणजे अर्थात् प्रस्तुत तरी भारत धर्माचीं अहिंसा, सत्य, अस्तेय, शौच व इंद्रियनिग्रह हीं पांच मूलतत्त्वें आहेत. तीं पूर्वीं म्हणजे अगदीं प्रथम भारतांत अस्तित्वांत आलीं तो काल आणि आजचा काल यांत महदंतर आहे. म्हणून याच मूलभूत तत्त्वांवर धर्माचें पुनरुज्जीवन झालें तरी तें पुनरुज्जीवन त्याच त्याच शब्दांनीं धर्माच्या आज्ञा म्हणून जाहीर केल्या तर त्या आज कोणाला मानवणार नाहींत. म्हणून त्याचें एक त्या तत्त्वांवरच ' मानवनीतिशास्त्र ' बनवावें लागेल. त्याला ' मानवनीति ' असें मानण्यांत येईल.

धर्म आज्ञा करतो व धर्म तशी आज्ञा कां करतो तें नीति विशद करून सांगते म्हणून हल्लींच्या बुद्धिवादी मानवांना धर्म म्हणून आज्ञा करण्याचें सोडून देऊन धर्म म्हणजे 'मनुष्यत्वानें वागण्याची **मानव-नीति**' कार्यकारणभाव दर्शवून बुद्धिवादी लोकांना प्रथम ती शिकविली पाहिजे. व ती प्रस्तुतच्या काळाला अनुरूप अशीच असली पाहिजे. हेंच तें धर्माचें पुनरुज्जीवन होय. आणि ही 'मानवनीति' म्हणजेच भारताचा भारतांतील 'विश्वधर्म' होय.

याचें विशेष स्पष्टीकरण करण्यापूर्वी आपल्या भारतीय तत्त्वज्ञान्यांनीं व अवतारी पुरुषांनीं समाजधारणेला पोषक असा भारत धर्माचा काय निष्कर्ष काढला आहे तो प्रथम थोडक्यांत सूत्ररूपानें पुढील प्रकरणांत देऊन नंतर आज ( १९५४ मध्यें ) त्याचें पुनरुज्जीवन कसें असावें त्याचें स्पष्टीकरण त्याच्या पुढील प्रकरणांत करण्यांत आलेलें आहे.

भारत धर्माचा हा निष्कर्ष माहीत नसेल तर आजच्या सुशिक्षित मनुष्यालाहि आपलें खरें स्वरूप काय आणि मानवी देहाचें कर्तव्य काय तें सांगतां येणार नाहीं आणि दुसऱ्यानें सांगितलें तरी त्याला तें पटणार नाहीं अशी आज स्वतंत्र भारतांत परिस्थिति उत्पन्न झाली आहे. म्हणून स्वदेशहितचिंतकांनीं तें प्रथम आत्मसात करून घ्यावें आणि मग जें बुद्धीला पटेल तें देशकार्य अंगावर घ्यावें म्हणजे दिशाभूल न होतां तो आपला उद्धार आपण करून घेईल व स्वराज्याचें सुराज्य करण्याला इतरांनाहि आपल्या शक्तीप्रमाणें मदत करूं शकेल.

प्रकरण २ रें

# भारत धर्माचीं मूलतत्त्वें

**अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः**

( मनु. १०–६३ )

" अहिंसा, सत्य, अस्तेय म्हणजे चोरी न करणें, शौच म्हणजे काया, वाचा व मन यांची शुद्धता आणि इंद्रिय निग्रह " हे सामान्य धर्म सर्व वर्णांत सांगितलें आहेत.

देहच मी असें वाटणें हें अज्ञान. देह मी नसून देहासकट सर्व दृश्याचा द्रष्टा तो मी असें ज्ञान होणें हें ज्ञान व ह्या ज्ञानाज्ञानाचें जें ज्ञान तेंच सत्याचें म्हणजे सद्वस्तूचें किंवा परमात्म्याचें ज्ञान होय.

देहच मी असा अभिमान धरणारा तो जीव ( व्यवहारी जीव ) व देहाचा द्रष्टा तो मी असें समजून देहाचे ठिकाणीं द्रष्टा ( साक्षी ) रूपानें राहाणारा तो ईश्वर व ह्या दोघांनाहि ज्याचा आधार आहे तो आत्मा किंवा परमात्मा होय.

ईश्वर अव्यक्त असून तो सर्वव्यापी व सर्वसाक्षी आहे. जगतांत तो नाहीं असें ठिकाण नाहीं व असा कालही नाही.

जगतांत द्रष्टा आणि दृश्य अशीं दोनच मुख्य तत्त्वें आहेत. द्रष्टा कधीं दृश्य होत नाहीं व दृश्य कधीं द्रष्ट्याला पाहू शकत नाहीं.

देहांत राहणारा तो आत्मा किंवा देहात्मा. जगतांत राहणारा तो जगदात्मा व सर्व विश्वांत राहाणारा तो विश्वात्मा किंवा परमात्मा असें म्हटलें जात असलें तरी परमात्मा ( परमेश्वर ) एकच.

विश्वात्मा नुसता विश्व व्यापूनच राहिला आहे असें नव्हे, तर सर्व विश्व तोच झाला आहे. त्यालाच परमात्मा, परमेश्वर, आत्मा, ईश्वर किंवा तत् असें म्हणतात. तो अनंत, अविनाशी व ज्ञानस्वरूप असून त्याला 'ज्ञ' असेंहि म्हणतात.

वेदान्त्यांचा परमात्मा किंवा ब्रह्म, सांख्यांचा समष्ट्यात्मक पुरुष, भक्तांचा परमेश्वर व गीतेंतील उत्तम पुरुष किंवा पुरुषोत्तम तो हाच. व हल्लींच्या भाषेंत बोलावयाचें तर जगताचे बुडाशीं जें एकच एक अविनाशी व नित्य तत्त्व आहे असें समजतात तेंहि हेंच. त्यालाच सदरील लोकांचीं हीं निरनिराळीं नांवें आहेत किंवा इतरांचीं दुसरींहि नांवें असतील. नांवें भिन्न भिन्न पण सद्वस्तु एकच.

तो परमात्मा किंवा परमेश्वर सर्व जगतांत अंतर्यामीं रूपानें राहिला असून तो सर्वव्यापी व सर्वसाक्षी आहे असें द्वैती भाषेंत बोललें जात असलें, तरी जगत् निराळें व त्याचा द्रष्टा ( साक्षी ) निराळा असें तेथें द्वैत नसून परमात्माच सर्व जग झाला आहे असें समजावें. तें कसें, तर मानवदेहधारी जीवात्मा मानवी देह झाला आहे तसें, असें समजावें.

जीव, जगत्, ईश्वर, काल व कर्म हीं परमात्म्याचींच रूपें आहेत असें समजलें जात असलें तरी त्यांचा मानवी जीवांशीं घनिष्ठ व नित्याचा संबंध असल्यामुळें अनादि कालापासून त्यांचा विशेष विचार झालेला असून त्याचे निरनिराळ्या तऱ्हेनें निर्णय ठरलेले आहेत. इतकेंच नव्हे, तर त्यांचीं सांख्य, वेदान्त, न्याय इत्यादि षड्शास्त्रेंहि बनलेलीं आहेत. त्यांतील विशेष बुद्धीला पटणारा असा पुढील निर्णय ग्राह्य धरून विचार करण्यांत येत आहे.

अग्नीपासून जशा ठिणग्या निघतात तसे जगांतील सर्व मानवी

जीव हे परमेश्वरापासून उत्पन्न झालेले आहेत. म्हणजे प्रत्येक मानवी जीव हा ईश्वरी अंश आहे.

मानवी जीव ईश्वराचा अंश असल्यामुळें जें ईश्वरांत आहे तें सर्व त्याच्यांत आहे. म्हणून याला " पिंडब्रह्मांड न्याय " असें म्हणतात. यानें भारतीय तत्त्वज्ञान कोणालाहि आपल्याशींच पटवून घेतां येण्यासारखें आहे.

पिंडब्रह्मांड न्यायानें जगांतील जगदात्मा जगत् झाला आहे. तद्वतच मानव देहांतील देहात्मा मानवी देह झाला आहे. जगतांत जगदात्मा आहे म्हणून जगत् चाललें आहे. त्यालाच ईश्वर किंवा परमेश्वर असें म्हणतात.

देहांत देहात्मा आहे म्हणून देह चालला आहे तद्वतच जगतांत जगदात्मा आहे म्हणून जग चाललें आहे.

देहधारी आत्माच मानवी देहामध्यें जीव व ईश्वर होऊन राहिला आहे. जेव्हां तो द्रष्टा म्हणून अलिप्त असतो तेव्हां तो प्रत्येकाचे देहांतील ईश्वर आणि द्रष्टा ( साक्षी ) साक्षित्व टाकून विषय ग्रहण करूं लागला म्हणजे तो जीव, जीवात्मा किंवा देहात्मा होय.

सर्वांत श्रेष्ठ असा मानवी देह जीवाला प्राप्त झाला असून आपला उद्धार आपणच करून घेण्याचें ज्ञान व सामर्थ्य ह्या मानवी देहांतच आहे.

द्रष्टा म्हणजे देहाधिष्ठित आत्मा साक्षी असतो म्हणून आपणाला स्थूल, सूक्ष्म व कारण असे तीन देह आहेत असें ज्ञान होतें.

देहाचे ठिकाणीं ज्याचा साक्षी म्हणून बोध होतो तो आपल्या तीनहि देहांत जीवरूपानें निश्चित होऊ राहिला आहे, म्हणून मी म्हणजे जीव असें आपणाला ज्ञान होतें.

मानवी जीवाला तीन देह आहेत, त्याप्रमाणें निरनिराळ्या

परिस्थितींत राहण्याला तीन लोक आहेत. मृत्युलोकांत तो स्थूल व सूक्ष्म देहानें राहतो व मृत्यूनंतर कामलोकांत तो सूक्ष्म देहानें (वासना देहानें) राहतो.

स्थूल-देह हाडा-मांसाचा व सूक्ष्म-देह वासनात्मक असून पंच कर्मेंद्रियें, पंच ज्ञानेंद्रियें, पंचप्राण, मन व बुद्धि ह्या सतरा तत्त्वांचा झालेला आहे.

तिसरा कारण-देह याला प्रत्यक्ष रूप नसून स्वस्वरूपाचें अज्ञान हाच कारण-देह होय. ह्या अज्ञानामुळेंच जीव स्वतः ईश्वर असूनहि मी ईश्वर आहे असें त्याला (मानवी जीवाला) वाटत नाहीं. ह्या अज्ञानामुळेंच प्रकृतिस्वभावाप्रमाणें देहाकडून होत असलेलें कर्म मी करतों असा जन्मजातच अभिमान उत्पन्न होऊन जीव सुखदु:खात्मक कर्में करतों व इहपरलोकीं त्याचें सुखदु:खात्मक फल भोगतो.

जीवाची इहपरलोकींची यात्रा सुखावह होऊन अंतीं त्याला मोक्ष म्हणजे अविनाशी सुख मिळावें म्हणून धर्माची उत्पत्ति झाली आहे.

जीवाची कामलोकांतील वस्ती संपली म्हणजे पदरीं पुण्याई असली तर तो स्वर्गलोकीं सूक्ष्म देहानें स्वर्गसुख भोगतो व पुण्याई संपली म्हणजे मृत्युलोकांत पुन्हां जन्म घेऊन व सुखदु:खात्मक कर्में करून त्यांचें सुखदु:खात्मक फल भोगतो. ही जन्ममरण परंपरा जीवाचे मागें केव्हां व कशी लागली तें निश्चित ठरवितां येत नाहीं.

मानवी जीवाला कर्मस्वातंत्र्य आहे, पण कर्मफलनियंत्रण त्याचे हातीं नाहीं. तें ज्याच्या हातीं आहे तो ईश्वर.

मानवी जीव ईश्वराचा अंश असल्यामुळें त्याच्या देहांतहि ईश्वर आहे. तो त्याच्या हृदयांत म्हणजे बुद्धींत राहतो व जीवाला त्याच्या

कर्मांप्रमाणें तसतसें वागण्याची बुद्धि देऊन जीव त्याप्रमाणें वागतो. म्हणन मानवी जीव सर्वस्वी स्वतंत्र नाहीं.

इतर जीवांपेक्षां बरेंवाईट कळण्याची बुद्धि मनुष्याला ईश्वरानें दिली आहे व तसें वागण्याची त्याला स्वतंत्रताहि आहे, म्हणून मनुष्य आपल्या कर्माबद्दल जबाबदार आहे.

मनुष्याच्या हातून एकदां कर्म घडलें म्हणजे मग तें चांगलें असो किंवा वाईट असो त्याचें फल भोगल्याशिवाय त्याला तें चुकवितां येत नाहीं. म्हणून सुख पाहिजे असेल तर दुष्कर्म करण्याचें टाळणें व सुखाकरतां सत्कर्म करणें हाच त्याला सदुपाय होय.

बुद्धीचे वासनात्मक बुद्धि व शुद्ध बुद्धि असे दोन प्रकार आहेत. वासनात्मक बुद्धींत जीव राहतो व शुद्ध बुद्धींत ईश्वर असतो. वासनात्मक बुद्धि बंधाला कारण होते व शुद्ध बुद्धि मोक्षाला पोषक होते.

आपण ज्याला मी असें म्हणतों तो आपण कोण ? सुखदुःख कोणाला व कां होतें; जीव, जगत्, ईश्वर, काल व कर्म यांचीं स्वरूपें काय, त्यांचा आपला संबंध काय व आपलें कर्तव्य काय इत्यादि सर्व फक्त मानवी देहांतच मनुष्याला समजण्यासारखें आहे, म्हणून मानवी देह सर्वांत श्रेष्ठ होय.

जीव म्हणजे ईश्वरच होय. जीव व ईश्वर हीं आत्म्याचींच रूपें आहेत. आत्मा आकाशाप्रमाणें सर्व जगतांत व्यापून राहिला आहे, पण तो आकाशाप्रमाणें जड मात्र नाहीं. आकाशाशिवाय एकहि ठिकाण नाहीं, तद्वतच परमात्म्याशिवाय एकहि ठिकाण नाहीं; पण मानवी देहाशिवाय तो तसा आहे असें त्याचें किंवा दुसऱ्या कशाचेंहि ज्ञान होणें शक्य नाहीं, म्हणून मानवी देहाची महती.

मी कोण असा विचार मनुष्य करूं लागला म्हणजे सर्वांचा द्रष्टा

तो मी असें ज्ञान होतें; पण त्यावेळींच द्रष्टा आणि दृश्य असें द्वैत भासूं लागतें व मनुष्य जगताचा विचार करूं लागतो.

असा विचार करकरून अखेरीला असा निष्कर्ष निघाला आहे कीं, ' मी ' असें म्हणणारा जो मानवी जीव त्याला स्थूल, सूक्ष्म कारण असे तीन देह आहेत; भूत, भविष्य व वर्तमान असे तीन काल आहेत; कायिक, वाचिक व मानसिक अशा तीन शक्ति आहेत; जागृति, स्वप्न व सुषुप्ति अशा तीन अवस्था आहेत; परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी अशा चार वाचा आहेत; सत्त्व, रज, तम असे तीन गुण आहेत.

ह्या देहाचे ठिकाणीं विचारी मनुष्याला इतकें ज्ञान झालें तरी हा देह व हें जगत् चालवणारा कोण, रक्षण करणारा कोण, व ज्याला कळतें म्हणजे ज्ञान होतें तो ज्ञान ग्रहण करणारा कोण व ज्ञान म्हणजे तरी काय याचा विचार केला तर विचार करकरून शेवटीं असें ठरलें आहे कीं जें आहे तें " सदैकः " म्हणजे सदैव एकच आहे. तेथें द्वैतच नाहीं तर विचार कसला आणि विचार करणारा तरी दुसरा कोण !!

एवंच जें एकीएक आहे, तें कधीं नाहीं असें होणारें नाहीं व जें नाहीं त्याचें अस्तित्वच संभवत नाहीं. असा तत्त्वज्ञान्यांनीं निर्णय ठरविला आहे. म्हणून जो आहे तो एकीएकच आहे. पण विचारी मनुष्य आपणाला आपण परमेश्वरापासून निराळें आहों असें समजत आहे तोंपर्यंत त्यानें मनुष्य होऊन मानवी नीतीनें म्हणजे धर्मानें वागलें पाहिजे.

अहिंसा, सत्य, अस्तेय, शौच व इंद्रियनिग्रह हीं धर्माचीं पांच मूलतत्त्वें असून त्याला धरून कर्म करणें हा मानवी धर्म होय. तसेंच

कर्माचें कायिक, वाचिक व मानसिक असे तीन प्रकार असून शिंदळकी, हिंसा व चोरी हीं तीन कायिक; कटु ( अप्रिय ), असत्य, उणें व विसंगत बोलणें हीं चार वाचिक आणि परद्रव्याभिलाषा, दुसऱ्याचें वाईट चिंतणें आणि खोटा आग्रह हीं तीन मानसिक मिळून दहा प्रकारचीं दुष्कर्में म्हणजे अधर्म आहेत. ते न करणें म्हणजेच मानवी धर्म होय. मानवी जीवाचें अज्ञान नष्ट होऊन तो आपल्या स्वस्वरूपाला जाऊन मिळणें हें त्याचें अंतिम ध्येय आहे तें त्याला मिळेपर्यंत त्यानें धर्माचें ( नीतिधर्माचें ) आचरण करीत राहणें हेंच त्याचें कर्तव्य होय.

धर्माप्रमाणें वागलें असतां मनुष्य तें ध्येय आज ना उद्यां केव्हांतरी निश्चित गांठूं शकेल हें त्रिवार सत्य आहे.

**धर्म**—धर्म म्हणजे हरएक मानवी जीवानें आत्मौपम्य बुद्धीनें इतर जीवांशीं वागण्याची नीति ( धर्म किंवा नियम ) होय. धर्म म्हणजे राष्ट्रधर्म नव्हे तर विश्वधर्म ( सर्व जगताचा धर्म ) होय.

ईश्वराची प्रीति किंवा भीति असल्याशिवाय धर्म पाळला जात नाहीं. म्हणून मानवी जीवानें समजूं लागल्यापासून ईश्वराप्रीत्यर्थ म्हणून कांहीं तरी उपासनात्मक कर्म करीत असावें. नवविधा भक्तींपैकीं प्रस्तुत सर्वांनाच साधणारी अशी नामस्मरण भक्ति होय.

**ईश्वर**—ईश्वर म्हणजे सर्वव्यापी व सर्वसाक्षी परमात्मा. मग त्याला कोणी कोणत्याहि नांवानें, रूपानें किंवा कसाहि ओळखो. सर्व जगांत ईश्वर एकच.

**सूचना**—धर्माचीं हीं मूलतत्त्वें व त्यावर आधारलेले धर्माधर्म कितीहि श्रेष्ठ असले तरी आचरणांत ते कसे आणावे हें कार्य राज-संस्थेनें अंगावर घेऊन त्याचें शिक्षण दिल्याशिवाय म्हणजे ह्या विश्व-

धर्माला राजाश्रय असल्याशिवाय कोणी वैयक्तिकरीत्या हा धर्म समाजांत पाळूं म्हणेल तर तो उलट संकटांत पडेल. तरीपण प्रपंचांत म्हणजे आपल्या घरीं तरी तो पाळतां यावा किंवा निदान माहीत तरी असावा म्हणून अगदीं थोडक्यांत सूत्ररूपानें तो सांगितला आहे, पण प्रपंचांतहि तारतम्यज्ञान पाहिजे, नाहींतर अधर्मच धर्म वाटूं लागतो; पण ईश्वरावर भरंवसा असेल व त्याकरतां कोणी कांहींतरी करीत असेल तर वेळीं त्याला सुबुद्धि सुचेल, कारण ईश्वर आपल्या हृदयांत म्हणजे बुद्धींत वसत असतो, पण त्याला ओळखून जो धर्माप्रमाणें वागत असेल त्यालाच वेळेवर सुबुद्धि सुचेल नाहींतर सर्व व्यर्थ आहे. हेंच आम्ही ईश्वरापाशीं मागत असतों व तेंच प्रत्येक शहाण्या मनुष्यानें ईश्वरापाशीं मागत असावें. पण तो त्याला ओळखून त्याचेविषयीं कांहीं सत्कर्म करीत असेल तरच हा कोठें व कसा पाळावा तें सुचेल.

धर्मच अधर्म कसा होतो तें पाहा:—अहिंसा हें धर्माचें सर्वमान्य आद्य तत्त्व आहे, पण हिंसक व विधर्मी लोकांशीं वागण्याचा प्रसंग आला असतां, दुसरा जर आपली हिंसा करण्याला प्रवृत्त झाला असेल तर संरक्षणाकरतां तरी उलट हिंसेनेंच त्याचा प्रतिकार करून जीव वांचवणें हाच धर्म समजावा. यावेळीं अहिंसा धर्म पाळला तर तो अधर्म होईल. अशी ही धर्माधर्माची दिशा आहे.

तसेंच एखाद्यानें तरवार बक्षिस दिली पण ती वापरण्याचें ज्ञान नसेल तर दुष्ट मनुष्य तीच तरवार आपल्या हातांतून हिसकावून घेऊन आपलाच घात करील, म्हणून मोठी धर्मतत्त्वेंहि फार फार सावधगिरीनें वापरलीं पाहिजेत.

---

प्रकरण ३ रें

# विश्वधर्म म्हणजे मानवनीति

यस्मिन् यथा वर्तते यो मनुष्यस्तस्मिंस्तथा
वर्तितव्यं स धर्मः ।
मायाचारी मायया बाधितव्यः साध्वाचारः
साधुना प्रत्युपेया ॥ १ ॥
( म. भा. शांति. १०९-२९ )

अर्थः—आपल्याशीं जो जसें वर्तन करतो तसें त्याच्याशीं वर्तन ठेवणें ही धर्मनीति होय. मायावी पुरुषाशीं मायावीपणानें व साधु पुरुषाशीं साधुपणानें व्यवहार केला पाहिजे.

या विश्वधर्माचा म्हणजे अर्थात् सर्व मानवी जीवांचा विचार असला तरी आजची ही मानवनीति म्हणजे भारतांतील सर्व मनष्यें असें समजून त्यांचे मानव या दृष्टीनें मूलभूत हक्क काय आहेत त्यांचा विचार केला तर प्रत्येक मनुष्याला आपल्या स्वतःचें, स्वकुटुंबाचें व घरादाराचें रक्षण करणें आणि समाजांत राहावयाचें म्हणून सामाजिक नीति व मानवजात अबाधित राहावी म्हणून मानवनीति यासंबंधींचे कांहीं मूलभूत नीतिनिर्बंध ठरलेले आहेत. त्याप्रमाणें वागणें हा त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. म्हणून प्रत्येक मनुष्यानें आपल्या समाजांत प्रथम निदान आपल्या घरीं तरी विश्वधर्मानें वागलें पाहिजे, तरच तो मनुष्य; नाहींतर मनुष्य आणि इतर चतुष्पाद प्राणी यांच्यामध्यें कांहींच फरक राहणार नाहीं.

ज्यानें प्रजेचें धारण व पोषण होतें तो धर्म. असा धर्म शब्दाचा मूळ अर्थ आहे. आणि सर्व मानवजात एक ह्या दृष्टीनें कोणाहि मनुष्याला दुसऱ्याची हत्या करणें किंवा कोणाला शस्त्रानें, वाणीनें किंवा दुसऱ्या कशानेंहि दुखविणें व दुसऱ्याची वस्तु चोरणें किंवा जबरीनें अथवा फसवून लुबाडून घेणें हा अधर्म आहे. तो अधर्म मनुष्याच्या हातून घडला किंवा घडूं नये तें हातून घडलें तर तें लपविण्याकरितां म्हणून मनुष्य खोटें बोलत असतो व आपला स्वार्थ साधावा म्हणूनहि मनुष्य खोटें बोलून दुसऱ्याचा अर्थ बुडवतो. म्हणून खोटें बोलणें हा सर्वांत मोठा अधर्म आहे. तसेंच ओंगळ व गलिच्छ वागून स्वच्छतेनें वागणारांना किळस उत्पन्न करणें हा सामाजिक रीत्या अधर्म आहे. तसेंच इंद्रियांवर ताबा न ठेवतां सत्तेच्या व मत्तेच्या जोरावर परस्त्रियापहरण करणें किंवा वेळीं त्यांचे खूनहि पाडणें व सुखावह दिसला म्हणून परधर्म आचरणें हें मनुष्यप्राण्याला शोभण्यासारखें नाहीं. त्यामुळें कुटुंबसंस्था व समाजहि बिघडतो व हीन दर्जाची प्रजा उत्पन्न होऊन वर्णसंकर होतो व मानवजातीचा अधःपात होतो. म्हणून इंद्रियनिग्रह न करणें हाहि सामाजिक अधर्म आहे. एवंच हिंसा, चोरी, गलिच्छ रीतीनें वागणें व इंद्रियनिग्रह न करणें व असे अधर्म करून ते लपविण्याकरतां किंवा आपस्वार्थाकरितां म्हणून खोटें बोलणें हे सामाजिक अधर्म आहेत.

ते अधर्म न घडावे व जनतेचें धारण-पोषण व्हावें म्हणून अहिंसा, सत्य, अस्तेय, शौच व इंद्रियनिग्रह हीं भारतधर्माचीं सर्वसाधारण अशीं पांच मूलभूत तत्त्वें आहेत. तीं पाळलीं जावींत म्हणून अंशावतार व पूर्णावतार होऊन साधुसंतांकडूनहि कोणच्या ना कोणच्या रूपानें तरी धर्माचें रक्षण होत असे; पण इंग्रजी अंमलांत धर्माला कोणी त्राता

नव्हता म्हणून व भारत स्वतंत्र होऊन आज सात वर्षे झालीं तरी भारत निधर्मी राहिलें आहे म्हणून भारतांतील प्रत्येक मनुष्याला राजकारणांत, समाजांत व घरींहि कोणत्या धर्मानें वागावें याचा कांहींच निर्बंध न राहिल्यामुळें व व्यक्तिस्वातंत्र्य बेसुमार वाढल्यामुळें ज्याला जसें वाटेल तसें तो मोकाट वागत आहे. त्यामुळें समाजाची घडी बिघडून मानवी जीवाचे जन्मसिद्ध हक्कहि पाळणें अशक्य झालें आहे. इतकेंच नव्हे तर द्रव्याची व जीविताचीहि शाश्वती राहिलेली नाहीं. मानवी जीव म्हणजे किडामुंगीचा जीव असें झालें आहे. असें रोजीं वृत्तपत्र उघडतांच दिसून येतें.

अशा परिस्थितींत स्वराज्याचें सुराज्य होऊन त्याला चिरस्थायित्व यावयाचें असेल तर भारत आज राजकीय दृष्टया जरी निधर्मी समजलें जात असलें तरी समाजधारणेकरतां म्हणून सामाजिकरीत्या तरी दुसऱ्या कोणत्या तरी धर्मानें मनुष्यबद्ध झाल्याशिवाय व तो त्या धर्मानें न वागला तर त्याला कडक शिक्षा करणारा कोणी तरी असल्याशिवाय राज्यशकट सुरळीत चालण्याची आशा करणें व्यर्थ आहे.

इंग्रजांनीं आपलें राज्य टिकविण्याकरितां केवळ शिक्षणानें भारतीय संस्कृति नष्ट केली. तरी अजून शिक्षण संस्था अस्तित्वांत आहे व साक्षरताप्रसारहि जोरांत सुरू आहे. अशा वेळीं त्यांचा उपयोग प्रथम राष्ट्रीय शिक्षण म्हणजे विश्वधर्माला उचित असें नीतिशिक्षण शाळांतून सुरू झालें पाहिजे. नीतिशिक्षण म्हणजे धर्मशिक्षण असें कोणाला वाटत असलें व तें आड येत असलें तरी तें कोणत्याहि विशिष्ट राष्ट्रधर्माचें नीतिशिक्षण नव्हे तर तें सर्व मानवजातीकरतां शिक्षण आहे आणि विश्वधर्म म्हणजेहि सर्व मानवजातीचा धर्म होय. म्हणून कोणाहि परधर्मीयालासुद्धां कुरकूर करतां येणार नाहीं.

सर्व मानवी जीवांचें धारण-पोषण होऊन त्यांचें इहपरलोकींचें जीवन सुखावह व्हावें व अंतीं त्यांना शाश्वत सुख मिळावें म्हणून अनादिकालापासून म्हणजे मानवजात उत्पन्न झाल्यापासून आपल्या त्रिकालज्ञ पूर्वजांनीं तपःसामर्थ्यानें व दीर्घप्रयत्नानें सर्व दृश्यादृश्य सृष्टीचे नियम शोधून काढून जें तत्त्वज्ञान सर्व मानवजातीकरतां म्हणून भारतांत सांठवून ठेवलें आहे तें सर्व तत्त्वज्ञान थोडक्यांत कळावें म्हणून सूत्ररूपानें संकलित करून मागील प्रकरणांत सांगितलें आहे. तें फक्त भारताकरतांच नव्हे तर सर्व मानवजातीकरतां आहे. म्हणून तें शिक्षण शाळांतून सुरू करणें हें सर्व मानवजातीकरितां असल्यामुळें ओघानेंच त्याला विश्वधर्म असें नांव योग्य असलें तरी त्यांत कोणताहि विशिष्ट राष्ट्रधर्म येत नसल्यामुळें हा विश्वधर्म म्हणजे कोणताहि राष्ट्रधर्म नव्हे तर मानवनीति होय आणि त्याचें शिक्षण हेंच राष्ट्रीय शिक्षण होय. धर्माचें आजचें पुनरुज्जीवन तें हेंच, आणि तोच विश्वधर्म समजावा.

मनुष्याचे सर्वसाधारण सामाजिक धर्म सांगितले, त्याप्रमाणें त्यानें समाजांत व घरीं म्हणजे स्वकुटुंबांत वागून शिवाय वैय्यक्तिक आचरणहि कसें ठेवावें यासंबंधींहि भारतधर्माचें पतिधर्म, स्त्रीधर्म, पुत्रधर्म, पितृ-धर्म वगैरे अनेक स्वधर्म आहेत. त्याला व्यवहारांत मानवी कर्तव्य असें म्हणतात. हें कर्तव्य परिस्थितप्रिमाणें केव्हां केव्हां बदलत असल्यामुळें व मनुष्याला कर्माशिवाय राहतां येत नसल्यामुळें कर्माचे कायिक, वाचिक व मानसिक असे तीन भाग करून कर्मसंबंधीं धर्माचे सर्व-साधारण असे दहा अधर्म ठरले आहेत. ते प्रत्येक मनुष्याला अवगत असले पाहिजेत, तरच कौटुंबिक संस्था तरी अबाधित राहून मनुष्याला ह्या सुखदुःखात्मक संसारांतहि आपला संसार सुखाचा करून घेतां

येईल, म्हणून तें सुस्पष्टरीतीनें थोडक्यांत पुन्हां पुढें देतों. कुटुंबसंस्था भारतांत आहे तशी दुसऱ्या देशांत क्वचितच सांपडेल.

शिंदळकी, हिंसा व चोरी हे तीन कायिक; कडू ( अप्रिय ), असत्य, उणें व विसंगत हे चार वाचिक; व परद्रव्याभिलाष, दुसऱ्याचें वाईट चिंतणें व खोटा आग्रह हे तीन मानसिक असे एकंदर दहा प्रकारचे अधर्म आहेत. ते टाळले तर मनुष्य स्वधर्मानें वागला असें होऊन निधर्मी राज्यांतहि ‘ धर्मो रक्षति रक्षितः ’ या न्यायानें धर्मच त्याचें रक्षण करील अशी धर्माची ग्वाही आहे.

हे अधर्म कुटुंबांतील प्रत्येक मनुष्य आपलें कर्तव्य ओळखील तर प्रथम कुटुंबांत तरी टाळतां येण्यासारखे आहेत. कौटुंबिक रहाणी किंवा परिचार म्हणजे वागणूक हा सर्व देवघेवीचा व्यापार आहे. कुटुंबांतील सर्व मनुष्यें पूर्वजन्मार्जित जे परस्पर सुखदुःखात्मक ऋणानुबंध आहेत ते फेडून घेण्याकरतांच एकत्र जमा झालेलीं असतात; तीं आपापलें ऋण फेडून घेतल्याशिवाय राहणार नाहींत हें निश्चित आहे.

प्रपंचांतील हें सुखदुःख कांहीं बाबतींत तरी ठरलेलें असून आयतेंच वाढून येत असल्यासारखें असल्यामुळें सुखाचे वेळीं तरी मनुष्य कसलाच विचार करीत नाहीं म्हणजे तसा विचार करण्याचें त्याला कारणच पडत नाहीं; पण प्रपंचांत दुःखाचे प्रसंग आले म्हणजे जो मनुष्य आपल्या दुःखाचें निमित्त कारण झाला असेल तोच आपल्या दुःखाचें कारण आहे असें समजून जो तो आपापल्या शक्तीप्रमाणें त्याचें उट्टें काढीत असतो; परंतु अज्ञानामुळें सुखाप्रमाणें आजचें आपलें दुःख हेंहि आपल्याच पूर्वकर्माचें फल आहे म्हणजे ह्या दुःखाचें

कारण जें दुष्कर्म तें पूर्वींच होऊन गेलेलें असतें हें त्याला समजत नाहीं म्हणून पुन्हां सूडबुद्धि किंवा दुर्बुद्धि उत्पन्न होते.

तसेंच कर्मांचे बाबतींत प्रत्यक्ष कर्म घडत असतें तेव्हां तें कर्म प्रारब्धफल भोगण्याकरतां आहे किंवा प्रारब्ध बनविण्याकरतां आहे हें स्पष्टास्पष्ट समजण्याला दृश्य सृष्टींत तरी मार्ग नसतो म्हणून हि मनुष्याचे हातून दुष्कर्म घडत असतें. म्हणून प्रपंचांत तरी दुःखाचे बाबतींत सावध राहून सूडबुद्धि किंवा तत्सम प्रतिक्रिया करण्याचें मनुष्यानें सोडून द्यावें. जीं दुःखें येतील तीं येणारच होतीं असें समजून तीं निमूटपणें सहन करून सारून टाकावीं व पुढें तरी असलें दुःख आपणांवर येऊं नये व आपले हातून सदैव सत्कर्मच घडावें म्हणून ईश्वरापाशीं प्रार्थना करीत असावें व जें कर्म हातून घडेल तो अधर्म तरी नसावा अशी मनुष्यानें काळजी घेत असावी, व एखादे वेळीं दुष्कर्म घडलें तरी मनानें आपणच आपला निषेध करून वासना व देह पवित्र व शुद्ध राखण्याचा सारखा प्रयत्न करीत असावें. पश्चात्तापा-सारखी दुसरी शुद्धि नाहीं. प्रेमानें प्रेम वाढवून प्रपंचांतील आनंद लुटावा, परंतु सूडानें किंवा दुष्टाव्यानें आनंद मानण्याची किंवा प्रौढी मिरविण्याची दुष्ट प्रवृत्ति सोडून द्यावी. अशी ही प्रपंचांत राहून प्रपंच सुखी करून घेण्याची गुरुकिल्ली आमचे गुरु श्रीबीडकर महाराज यांनीं सांगितलेली आहे. परमेश्वराकडे ओढा असेल तर श्रेष्ठ वाङ्मयाची किंवा मनुष्याची सत्संगति मिळून हातून सत्कर्म घडेल. म्हणून धर्म सोडूं नये व ईश्वराला विसरूं नये म्हणजे सुखदुःखात्मक प्रपंचहि सुखदायी होण्याला मदत होईल. अशी ही विश्वधर्माची म्हणजे मानवनीतीची दिशा आहे.

क्रिया तशी प्रतिक्रिया. मग ती कायिक, वाचिक किंवा मानसिक

कशीहि असो, क्रिया झाली कीं प्रतिक्रिया होणार हें अगदीं निश्चित आहे. म्हणून कायिक, वाचिक व मानसिक सर्व दुष्कर्माला जपलें पाहिजे. मनुष्य कायिक अधर्माला एखादे वेळीं तरी कचरतो पण मानसिक अधर्म दुसऱ्याला न कळतां गुप्त रीतीनें करतां येत असल्या-मुळें मानसिक दुष्ट विचार घोळीत बसण्याला त्याला दिक्कत वाटत नाहीं, पण मानसिक क्रिया ही कायिक व वाचिक क्रियेचें बीज आहे हें मनुष्यानें स्मरणपूर्वक ध्यानांत ठेवून प्रथम मानसिक सुविचार (सत्कर्म) करीत असावें. तें हातून घडत नसेल तर तो प्रत्यक्ष किंवा वाङ्मय कुसंगतीचा दोष आहे असें समजून शाळेंत व घरींच प्रथम नीतिशिक्षण सुरू झालें पाहिजे तरच इंग्रजी शिक्षणाचे म्हणजे अर्थात् जडवादाचे दुष्परिणाम उच्च शिक्षणानें नाहींसे करतां येणें शक्य आहे.

कोणत्याहि सुशिक्षित मनुष्याला सुद्धां तुझा धर्म कोणता व त्याचीं मूलभूत तत्त्वें कोणतीं तें विचारलें तर त्याला तीं सांगतां येत नाहींत. माणसाला मनुष्यत्व प्राप्त होण्याला व समाजांत नीतिधर्मानें वागण्याला कांहीं तरी धर्म असतो हें त्याच्या गांवींहि नसतें. हें भारतीय संस्कृतीला अस्पृश्यतेसारखेंच मोठें लांछन उत्पन्न झालें आहे. तें नाहींसें होण्याला विश्वधर्मच समर्थ होईल. म्हणून राज्यसंस्थेनें हें धर्माच्या पुनरुज्जीवनाचें कार्य अंगावर घेऊन शिक्षणसंस्थेपासून आरंभ केला तर भारताला पूर्वींचें वैभव प्राप्त होईल व साक्षरतेचें चीज होऊन हा विश्वधर्म म्हणजे मानवनीति म्हणून सर्व जगांत संस्मरणीय होऊन राहील. नाहींतर साक्षरताउलट घातुक होईल.

आजचा म्हणजे १९५४ चा हा विश्वधर्म म्हणजे सनातन वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन होय. त्यांत सर्व मतांचा समन्वय होत असून त्याप्रमाणें " अद्वैत सिद्धान्त, सत्कार्यवाद व जीवब्रह्म ऐक्य "

असा निष्कर्ष निघत आहे. म्हणजे त्यांत अद्वैत सिद्धान्त आहे. सत्कार्यवाद मत आहे व त्याप्रमाणें वागून जीवानें 'मी ब्रह्म आहें' हें स्वानुभूतीनें पटवून घेणें हें जीवाचें अंतिम ध्येय आहे.

या अंतिम ध्येयाच्या प्राप्तीकरतां विश्वधर्माच्या तत्त्वज्ञानावरच मानवनीति आधारली गेली असली तरी प्रस्तुत त्याप्रमाणें वागणें विचारी मनुष्यालाहि अतिकाठिण आहे. नीति-शिक्षणाचा इंग्रजी शिक्षणाबरोबरच लोप झाल्यामुळें आपल्या आचारविचारांत कांहीं दोष म्हणजे अधर्म आहेत. असें कांहीं अपवाद सोडले तरी आजच्या सुशिक्षित मनुष्यालाहि वाटत नाहीं, म्हणजे धर्म व ईश्वर भावना ही त्यांच्यांतून समूळ नष्ट झाली आहे असें दिसत आहे. तर मग सामान्य जनता पशूप्रमाणें मोकाट वागूं लागली तर त्यांत मोठेसें आश्चर्य नाहीं.

अशा वेळीं ह्या विश्वधर्माच्या पुनरुज्जीवनाचें हें तत्त्वज्ञानहि व्यर्थ आहे. तें पुढें केव्हां उपयुक्त होईल तें होवो, तें राजसंस्थेवर अवलंबून राहील. पण एखाद्याला ही मानवनीति वैय्यक्तिकरीत्या आपल्या घरीं तरी कशी पाळतां येईल याचा विचार करणें असेल तर त्याला मदत व्हावी म्हणून सद्गुरूचें स्मरण करून काय सुचलें तें थोडक्यांत पुढें देतों.

विश्वधर्माचीं अहिंसा, सत्य, अस्तेय, शौच व इंद्रियनिग्रह हीं पांच आद्य मूलतत्त्वें असून तीं समाजधारणेला अवश्य असलीं तरी धर्माला राजाश्रय असल्याशिवाय समाजांत तीं पाळतां येणें अशक्य आहेत. तरी पण मूलतत्त्वांवरच आधारलेलीं "**शौच, तप, संतोष, स्वाध्याय व ईश्वरभक्ति**" हीं नीतितत्त्वें वैय्यक्तिकरीत्या तरी पाळतां येण्यासारखीं असून ज्यांना इहपरलोकींचें जीवन सुखावह होऊन अंतीं मोक्ष म्हणजे अविनाशी सुख मिळावें अशी ज्यांची इच्छा असेल त्यांना तर तीं उपयोगी पडण्यासारखीं आहेतच; पण व्यक्तिस्वातंत्र्याच्या

जोरावर पुरुषार्थ प्राप्त करून घेण्याची ज्यांची मनीषा असेल त्यांना वैय्यक्तिकरीत्याहि तीं पाळतां येण्यासारखीं असून शिवाय कोणत्याहि व्यक्तीला प्रस्तुतच्या आपल्या परिस्थितीप्रमाणें आचरतां येण्यासाठीं आपल्या सोयीप्रमाणें त्यांत बदल करूनहि पुरुषार्थ प्राप्त करून घेणें शक्य आहे, हा त्यांत विशेष आहे. हें केवळ शाब्दिक ज्ञान नव्हे तर आमचे गुरु श्रीरामानंद बीडकर महाराज यांनीं तशी स्वानुभूति प्रत्यक्ष मिळविलेली होती असें त्यांचें चरित्रच सांगत आहे.

**शौच**— शौच म्हणजे शारीरिक, वाचिक व मानसिक शुद्धि होय. नुसत्या कपड्यालत्त्यानें शरीर स्वच्छ ठेवणें ही खरी शुद्धि नव्हे. तर शरिरानें, वाणीनें व मनानेंहि परपीडा न करणें हीच खरी शुद्धि होय. पण व्यवहारी मनुष्याला असें वागणें अत्यंत कठीण असल्यामुळें परिस्थितीप्रमाणें वागणें प्राप्त असलें तरी मनानें जर कोणालाहि दुःख न देण्याचें व्रत पाळीत असेल व शरिरानें व वाचेनें आपल्यापासून दुसऱ्याला होत असलेल्या अपरिहार्य पीडेबद्दल वाणीनें किंवा मनानें ईश्वरापाशीं रोजीं क्षमा मागत असेल तर तें शौच म्हणजे शुद्धि राखण्यासारखेंच समजावें.

**तप**— तप म्हणजे मनाची निर्धारशक्ति वाढविणें होय. विषयांकडे धांवणारें मन मागें परतवून बुद्धींत राहणाऱ्या ईश्वराकडे लावण्याकरितां म्हणून कोठेंतरी ईश्वरी अस्तित्व मानून त्याची कायेनें, वाचेनें व मनानें अखंड सेवा करीत राहणें हेंच खरें तप होय. पण व्यवहारी मनुष्याला तसें करणें शक्य नसलें व तप झालें तरी त्याचें रक्षण करणें कठीण असलें तरी इंद्रियनिग्रह करून मन कोठें तरी स्थिर करण्याचा जर कोणी प्रयत्न करीत असेल तर तो तप करीत आहे असें समजावें.

**संतोष**—— संतोष म्हणजे कोणत्याहि स्थितींत समाधानी म्हणजे स्थिरबुद्धि असणें होय. पण मन स्थिर राहणें अति कष्टसाध्य असल्या-मुळें तप करण्यांत किंवा व्यवहारांत कितीहि श्रम किंवा कष्ट पडले किंवा अपयश आलें तरीहि तें आनंदानें म्हणजे कुरकूर न करतां सहन करणें होय. त्यायोगें मनुष्य समाधानी म्हणजे संतोषी होऊं शकेल, व तें अनासक्त मनुष्यच साधूं शकेल.

**स्वाध्याय**—— स्वाध्याय म्हणजे वेदाध्ययन असलें तरी शारीरिक व मानसिक स्वास्थ्य मिळविण्याकरतां ज्याचा जो आज व्यवसाय असेल तो करण्याला पात्र होण्याकरितां ज्या ज्या कला किंवा विद्या शिकणें प्राप्त असेल त्या शिकणें हाहि प्रस्तुत स्वाध्यायच होय.

**ईश्वरभक्ति**—— मनुष्याला कर्मस्वातंत्र्य असल्यामुळें अनन्यभक्ति करणें हीच खरी भक्ति होय. पण कर्मफलनियंत्रण आपल्या हातीं नसल्यामुळें तें ज्याच्या हातीं आहे त्या ईश्वराची इंद्रियनिग्रह करून नवविधाभक्तीपैकीं कोणतीहि भक्ति मनापासून केली असतां अनन्य-भक्तीचें श्रेय मिळेल. हरिनामस्मरणभक्ति करण्याला तर कोणत्याहि मानवी जीवाला कोणत्याहि काळीं, कोणत्याहि स्थळीं कोणाची कसलीहि आडकाठी नाहीं. फक्त मन तिकडे असलें म्हणजे पुरे आहे.

ही मानवनीति इतकी स्पष्ट केली तरी ती फक्त उत्क्रांत जीवच आचरूं शकतील, पण विश्वधर्माच्या म्हणजे सर्व मानवजातीच्या उन्नतीकरतां प्रत्येक मनुष्याला सहज रोजच्या व्यवहारांतहि आचरतां यावी म्हणून ज्या मानवनीतीला जनता आज अगदींच पारखी झाली आहे त्यांच्याकरितां कांहीं तरी ढोबळ नीति सांगितल्याशिवाय विश्वधर्माची ही मानवनीति पुरी होत नसल्यामुळें तीहि थोडक्यांत खालीं देतों.

जसा आपला जीव तसाच दुसऱ्याचा म्हणून कोणाहि मनुष्यानें दुसऱ्याचा जीव घेणें हा अधर्म. तसेंच दुसऱ्याला शस्त्रानें किंवा शब्दानें ताडण करणें किंवा दुखवणें हा अधर्म. आपली वस्तु चोरीला गेली म्हणजे आपणांला दुःख होतें तसेंच दुसऱ्याला, म्हणून दुसऱ्याची वस्तु चोरणें किंवा लाटणें हा अधर्म. शरीर अमंगळ ठेवणें अधर्म, कपडे मळकट व घाणेरडे ठेवणें अधर्म तसेंच खाण्यापिण्यांत व आचरणांत नियमितपणा नसेल तर शरीर रोगी होतें म्हणून हा अधर्म. तसेंच इंद्रियांवर ताबा न ठेवतां मनसोक्त म्हणजे मनाला वाटेल तसें वागणें हा अधर्म व असले अधर्म करून ते लपविण्याकरतां उलट खोटें बोलणें हा अधर्म. दुसऱ्यानें खोटें बोलून आपलें नुकसान झालें असतां आपणाला वाईट वाटतें तसेंच दुसऱ्याला हें माहीत असतांहि दुसऱ्याचें नुकसान करण्याकरतां खोटें बोलणें हा अधर्म.

सर्व पुरुषार्थांचें मूळ शरीर असल्यामुळें शरिराला विघातक अशीं कर्में करणें अधर्म. वीर्य रक्षण करणें हा शरीर निरोगी राखण्याचा पाया असल्यामुळें वीर्याची उधळपट्टी करणें हा अधर्म. मनुष्याचे सर्व व्यवहार वाणीनें चालत असल्यामुळें असत्य बोलणें हा अधर्म. उण्या शब्दानें दुसऱ्याला दुखवणें हा अधर्म. असंबद्ध बोलण्यानें दुसरा फशीं पडतो म्हणून तसें बोलणें किंवा वचन देऊन दुसऱ्याला फशी पाडणें व खोट्या बातम्या प्रसृत करणें हा अधर्म.

मनुष्याची उन्नति किंवा अवनति होणें हें त्याच्या मानसिक विचारावर अवलंबून असल्यामुळें वरती सांगितलेले अधर्म मनांत डोकावले असतां आपले विचार दुसऱ्याला कळत नाहींत याचा फायदा घेऊन ते सारखे मनांत घोळीत बसणें हें अनीतीचें बीज होत असल्यामुळें हा सर्वांत मोठाच अधर्म होय.

असे हे सर्व साधारण अधर्म आहेत ते मनुष्याचे हातून बुद्धिपुरःसर किंवा नकळतहि घडले तरी त्याचें फल जें दुःख तें भोगल्याशिवाय त्याला तें टाळतां येणार नाहीं. थोडक्यांत म्हणजे आपल्याला जें अप्रिय म्हणजे दुःखकारक वाटत असेल तसें वर्तन दुसऱ्याबरोबर करणें हा अधर्म होय. हें तत्त्व सदैव लक्षांत ठेवून वागत असावें तसेंच जें कर्म शारीरिक व मानसिक ऱ्हासाला कारणीभूत होतें तें दुष्कर्म व जें शारीरिक व मानसिक उन्नतीला पोषक होतें तें सत्कर्म होय असें समजावें.

एवंच धर्म किंवा नीतिधर्म हा मानवी उत्क्रांतीला पोषक असून अधर्म किंवा अनीति ही मानवी जीवांच्या अवनतीला ( अधःपतनाला ) कारण होते. हें विश्वधर्माचें म्हणजे मानवनीतीचें सार होय.

**विशेष सूचना**—हें सर्व खरें असून आजचा हा विश्वधर्म इतका श्रेष्ठ असला तरी विश्वधर्म म्हणजे सब गोलंकार नव्हे. विश्वधर्म म्हणजे मानवनीति समजण्याला मानवी जीवाला प्रथम मनुष्यत्व येण्याचें शिक्षण दिलें पाहिजे. म्हणून प्रथम शिक्षणसंस्था सुधाराव्या लागतील. त्याशिवाय विश्वधर्म अस्तित्वांत आणणें धोक्याचें आहे.

विश्वधर्माचें राष्ट्रीय शिक्षण, स्वधर्माचरण म्हणजे भारत धर्माचें आचरण, परधर्म ( इतर राष्ट्रधर्म ) यांवर बहिष्कार, व प्रतियोगी सहकारिता म्हणजे जो जसा आपणाशीं वागेल तसें त्याच्याशीं वागणें ही विश्वधर्माची चतुःसूत्री आहे. त्याला धरूनच शिक्षणाला सुरुवात झाली पाहिजे तरच साक्षरतेचें चीज होईल, नाहींतर साक्षरता अस्पृश्यतेप्रमाणें उलट घातुक होईल, हें येथें पुन्हां नमूद करून ठेवतों.

हा विश्वधर्म झटपट रंगारी नव्हे व तो तसा नाहीं म्हणून राज्यसंस्थेनें त्याची हयगय करणें अत्यंत धोक्याचें आहे. धोक्याच्या सूचना न पाळतां विमान सुरू केलें तर विमानासकट सर्वांचाच कपाळमोक्ष होतो. हा

अनुभव लक्षांत ठेवूनच सुरुवात झाली पाहिजे. तसेंच धोका आहे म्हणून विमानच चालवावयाचें नाहीं असें जर कोणी म्हणेल तर प्रस्तुतच्या वैज्ञानिक जगतांत तोही अविचार ठरेल हें विसरतां कामा नये.

**विशेष सूचना**—शेवटीं सूचना देऊन प्रकरण पुरें केलें तरी ही दुसरी सूचना देऊन ठेवतों. त्याचा प्रत्येक मनुष्यानें विचार करावा.

स्वराज्याचें सुराज्य होण्याकरतां वरती जी चतुःसूत्री सांगितली ती यशस्वी होण्याला भारतीय जनतेमध्यें ईश्वर-भावना सतत जागृत ठेवण्याची ज्याला जरूरी असेल त्यानें आमचें विचार-जागृति पुस्तक दोन चारदां तरी वाचावें. तें होत नसेल तर त्यानें आमचें हें पुस्तक सतत वाचनांत ठेवावें. त्यानें त्याला आपला संसार सुखाचा करून घेतां येईल. तसें करूनहि ईश्वर भावना जागृत होत नसेल तर “ जो ईश्वर हें सर्व जगत् सबाह्याभ्यांतर व्यापून राहिला आहे तो मला सुबुद्धि देवो ” असें स्मरण करून नंतर सकाळचा चहा घ्यावा. म्हणजे ईश्वर भावना जागृत राहून त्याला आपला संसार सुखाचा करून घेतां येईल व ही चतुःसूत्री यशस्वी होण्याला त्याची राष्ट्राला मदत होईल.

असें करूनहि काम झालें नाहीं तर त्यानें आमची प्रत्यक्ष गांठ घ्यावी म्हणजे आम्ही त्याला मदत करूं.

एवंच कांहीं झालें तरी ही चतुःसूत्री यशस्वी होण्याला व स्वराज्याचें सुराज्य होण्याला जनतेंत ईश्वर भावना जागृत रहाण्याचें काम सामाजिक व वैय्यक्तिकरीत्या अवश्य झालें पाहिजे. तरच आमची ही चतुःसूत्री खात्रीनें यशस्वी होईल. त्यामुळें राष्ट्राला खरी मदत केली असें होईल व तसें करणें हे प्रत्येक भारत पुत्राचें कर्तव्य आहे. ईश्वर सर्वांना सुबुद्धि देवो !

*

प्रकरण ४ थें

# मानवनीतीचें स्पष्टीकरण

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।
श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ १ ॥

( गीता १७–३ )

अर्थः—सर्व लोकांची श्रद्धा त्यांच्या सत्त्वाप्रमाणें म्हणजे प्रकृतिस्वभावाप्रमाणें असते. पुरुष ( जीव ) हा श्रद्धामय आहे. जशी त्याची श्रद्धा तसा ( तद्रूप ) तो होतो.

भारत धर्माची रूपरेषा, त्याचीं मूलतत्त्वें व त्यावर आधारलेला विश्वधर्म ( मानवनीति ) यांची माहिती पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या प्रकरणांत दिली. आतां या प्रकरणांत मानव नीति म्हणजे काय यावर चांगला प्रकाश पडावा म्हणून नुकताच आमचा एका जडवादी पदवीधर मनुष्यापाशीं घडलेला संवाद पुढें देतों.

हा पदवीधर मनुष्य चांगला बुद्धिवान असला तरी पाश्चात्य जडवादानें भारला जाऊन त्याचा देव व धर्म यांवर मुळींच विश्वास नव्हता; परंतु पूर्वीं एकदां दोनदां तो आमच्याकडे धर्मचर्चेकरतां म्हणून आलेला असल्यामुळें आम्ही त्याला योग्य तो सल्ला दिला व तो त्याला पटलाहि. तेंच हें मानवनीतीचें स्पष्टीकरण, असें समजण्यास हरकत नाहीं.

हा पदवीधर विवाहित असून तीं दोघेंहि नोकरदार असल्यामुळें त्या व्यवसायानिमित्त त्यांचा परस्पर सहवास घडून नंतर त्यांचा प्रेमविवाह झाला व एक मुलगाहि झाला; पण दुर्दैवानें नंतर त्यांच्यांत

इतकें वितुष्ट आलें कीं तीं दोघेहि एकमेकांचा खून करण्यापर्यंत पाळी आली आहे. पण पूर्वींची थोडीशी ओळख असल्यामुळें व पूर्वजन्मींचा तसा संकेतच नसल्यामुळें त्याचे हातून खून झाला नाहीं. खुनाचा विचार होतांच त्यानें आमचा सल्ला विचारला असतां आम्ही त्याला पुढीलप्रमाणें सल्ला दिला.

" विद्या, धन आणि भार्या या तीन बाबतींत तरी मानवी जीवाला किती सुख मिळणार हें सर्वसाधारणपणें ठरून तशा परिस्थितींतच मनुष्य जन्म घेत असतो. त्यांत स्वशक्तीनें बदल करणारा मनुष्य फारच विरळा. तरीपण प्रयत्नवाद खोटा नसल्यामुळें सहा महिनेपर्यंत पत्नीपासून दूर रहाण्याचा व रिकामे झालेलें मन बहकूं नये म्हणून आम्ही लिहिलेलीं "श्रीसद्गुरु रामानंद बीडकर महाराज यांचें चरित्र" व " विचार जागृति " हीं दोन पुस्तकें वाचण्याचा किंवा आवडत असेल तर ईश्वरभक्ति करण्याचा, किंवा गणित, वैद्यक, ज्योतिष इत्यादि शास्त्रांपैकीं जें आवडत असेल त्याचा अभ्यास चालू ठेवण्याविषयीं व नंतर सहा महिन्यांनीं प्रत्यक्ष भेटण्याविषयीं आम्ही त्याला सल्ला दिला. त्याप्रमाणें तो पत्नीपासून दूर राहिला. परंतु इतर गोष्टी न करतां दोन महिन्यांनींच त्यानें आमची गांठ घेतली. त्या वेळीं त्याचा आमचा पुढीलप्रमाणें संवाद झाला.

प्रश्न—माझी स्त्री जारकर्मी निघाली आहे, पण तें सिद्ध होणें अशक्य आहे, म्हणून सोडचिठ्ठी मागतां येत नाहीं. तरी तिला तिच्या कृत कर्माचें प्रायश्चित्त मिळालेंच पाहिजे. तें मिळाल्याशिवाय माझें मन स्वस्थ बसणार नाहीं. कांहीं सुचत नाहीं तर आतां पुढें काय करावें ?

उत्तर—पाश्चात्य शिक्षणानें आपलें दिसणारें जड शरीरच आपण. आपण कोण, आलों कोठून, जाणार कोठें, आपले या लोकीं येण्याचें

कारण काय, आपला स्त्रीपुत्रादिकांशीं संबंध काय, सुख मिळण्याकरतां व दुःख टाळण्याकरतां काय करावें. इहलोकीं आपण सुखदुःख कां भोगतों, परलोक व परलोकांतील सुखदुःख या सर्वांचें पूर्ण अज्ञान हें आपल्या सुखदुःखाचें मूळ कारण आहे. आपण आमच्याकडे आलां, पण आमच्यावर आपला विश्वास आहे असें दिसत नाहीं. सहा महिन्यांऐवजीं आपण दोन महिन्यांनींच भेटत आहां, म्हणून आमचा सल्ला आपणांस पटणार नाहीं.

यावर तो म्हणाला, " आपण म्हणतां तें अगदीं खरें आहे; पण आपल्याशीं खरें बोलावयाचें तर ईश्वर, परलोक व परलोकांतील सुख-दुःख, हें मला पटत नाहीं; पण आपली माझ्याविषयीं सहानुभूति आहे म्हणून मी आपणांकडे प्रत्यक्ष आलों आहें. तर प्रथम मला ईश्वराचें अस्तित्व पटवून द्याल तर आपल्यावर माझा विश्वास जास्त बसेल. " नंतर मी म्हणालों, " जगांत हल्लीं सेश्वर व निरीश्वरवादी म्हणजे आस्तिक व नास्तिक असे दोन मुख्य पक्ष उत्पन्न झाले असले तरी सर्व जगताचे बुडाशीं जें एकीएक अविनाशी, अनंत व नित्य तत्त्व आहे तें दोन्ही पक्षांतील तत्त्वज्ञान्यांना मान्य आहे. त्यालाच आम्ही ईश्वर समजतों. सबब ईश्वराचें अस्तित्व आतां निराळें सिद्ध करण्याचें कारण राहिलें नाहीं.

प्रश्न—स्वस्त्रीविषयीं जी ही सूडबुद्धि माझ्या मनांत उत्पन्न झाली आहे ती मला कांहीं करूं देत नाहीं. म्हणून दोन महिन्यांनींच मी आपली गांठ घेतली व आपण सांगितल्यापैकीं दुसरें माझ्या हातून कांहींच झालें नाहीं; तर प्रथम कांहीं तरी स्वास्थ्य उत्पन्न होईल असें कांहीं तरी सांगा.

उत्तर—जगांतील सुखदुःख आपण व्यवहारांत वागत आहों तोंपर्यंत ज्यांच्याशीं आपला नित्याचा निकट संबंध जडला आहे त्यांच्यावरच मुख्यत्वेंकरून अवलंबून असतें. जगांत सर्व दे-घेचाच व्यापार आहे. जसें द्यावें तसें घ्यावें हा उघडा न्याय आहे. पूर्वजन्मीं तुम्ही ज्या प्राण्यांना जसें सुख किंवा दुःख दिलें होतें, तसें तें देण्या-करितां किंवा घेण्याकरितां ते आज स्त्री-पुत्रादि रूपांनीं आपापलें उसनें फेडून घेण्याकरितां तुमच्याशीं जमा झाले आहेत आणि त्याप्रमाणेंच सर्व गोष्टी घडून येत आहेत; परंतु तुम्हांला वाटतें मी एम्. ए. शेंकडों विद्यार्थ्यांना विद्यादान देतों. सर्व जगाचा इतिहास मला माहीत आहे, आजच्या सर्व डिग्र्या (पदव्या) मीं मिळविल्या आहेत व सर्व मला मान देतात. म्हणून मी करतों तें सर्व न्याय्य. असा आपणांला पाश्चात्य विद्येचा जो अभिमान जडला आहे त्यामुळें इतर सर्व माणसें आपल्याला तुच्छ व हलकीं वाटतात. मनुष्यानें हा खोटा आग्रह सोडावा म्हणून आपल्या त्रिकालज्ञ मुनींनीं जें धर्मविषयक तत्त्वज्ञान भारतांत सांठवून ठेवलेलें आहे तेंच तुम्हांला पटावें म्हणून मी थोडक्यांत उघड करून सांगतों.

मानवी प्राणी जन्माला येतांच मातृऋण, पितृऋण, देवऋण इत्यादि ऋणें उत्पन्न होतात तीं फेडण्याकरितां म्हणजे आपणहि पुढें आईबाप होणार आहों म्हणून आईबापांच्या आज्ञेंत वागणें, देवानें आपणांला जन्म दिला व तोच आपलें रक्षण करतो म्हणून त्याकरितां म्हणजे अर्थात् आपणांला सुबुद्धि व्हावी म्हणून दहापांच मिनिटें तरी प्रत्यक्ष किंवा मनानें तरी रोजीं कांहीं तरी उपासनात्मक कर्म करणें; चरितार्थाकरितां विद्या किंवा कला संपादन करणें, न्यायानें द्रव्यार्जन करून, धर्मानें त्यांचा सद्व्यय करणें, सत्तेनें, मत्तेने किंवा अधिकारानें

कोणाला शरिरानें, वाणीनें किंवा मनानेंहि पीडा न देणें, चोरी न करणें, कपड्यालत्त्यानें शरीर नीटनेटकें राखणें व मन सुविचारानें पवित्र राखणें, इंद्रियें ताब्यांत ठेवण्याकरितां मनोनिग्रह करणें व थोडक्यांत म्हणजे ज्यांच्यांशीं आपला नित्याचा निकट संबंध जडला आहे तीं आपलीं पूर्वजन्मींचींच ऋणानुबंधी असल्यामुळें त्यांच्याशीं व सेवकजनांशीं प्रेमानें वागून इहलोकाप्रमाणेंच परलोकींच्या सुखा-करितांहि सत्कर्माचें भांडवल तयार करणें हें सुखाची इच्छा करणाऱ्या मनुष्यानें आपलें कर्तव्य समजावें. तें न करतां प्रपंचांत सुखाची म्हणजे अर्थात् स्वास्थ्याची इच्छा करणें व्यर्थ आहे.

आपणांला ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं शंका आहे, तद्वतच परलोकाविषयीं, तेथील सुखदुःखाविषयींहि, व पुनर्जन्माविषयींहि शंका आहे; पण आपल्या त्रिकालज्ञ पूर्वजांनीं हजारों वर्षांच्या तपश्चर्येनें व स्वानुभवानें जें सिद्धान्तरूपानें ठरविलें ते आपणांला आपल्या दहा पांच वर्षांच्या जडवाद्यांच्या शिक्षणानें असत्य वाटावें हें खरोखरच दुर्दैव होय. असो.

प्रपंचांत पतिपत्नींमध्यें सूडाच्या भावना उत्पन्न होणें ह्यासारखें इहलोकीं दुसरें दुःख नाहीं. जीवाला मानवी देह मिळाल्यापासून कर्माशिवाय त्याला क्षणभरहि रिकामें राहतां येत नसल्यामुळें व एका जन्मांत केलेल्या कर्माचें फल त्याच जन्मांत मिळून सर्व कर्म संपत नसल्यामुळें मनुष्याचे मागें जन्ममरणपरंपरा लागली असून त्याला दृश्यांत किंवा अदृश्यांत कोठे तरी राहावेंच लागतें. दृश्यांत तो स्थूल देहानें राहतो व अदृश्यांत सूक्ष्म म्हणजे वासना देहानें राहतो. दृश्य जगत् हा आपला मृत्युलोक व अदृश्य जगत् हा परलोक आहे.

मानवी देहच काय परंतु जगतांतील कोणत्याहि वस्तूला आत्यंतिक नाश नाहीं. ती दृश्यांत किंवा अदृश्यांत कोठें तरी कोणत्या ना कोणत्या रूपांत तरी असलीच पाहिजे. म्हणून मनुष्य मेला म्हणजे सुखदुःखांतून सुटला किंवा मुक्त झाला किंवा पुढें कांहीं नाहीं असें समजणें हें गाढ अज्ञान होय. मृत्यूनंतर स्थूल देह जातो; पण त्याबरोबरच मनुष्याची वासनाहि मरत नसल्यामुळें आजची वासना जशी उद्यां आपल्यापुढें दत्त म्हणून उभी राहते त्याप्रमाणें मृत्यूनंतर परलोकांत त्याची वासना त्याच्यापुढें उभी राहते व त्या वासनादेहानें त्याला तेथें राहावें लागतें. इहलोकीं जडदेह टिकवितां येत नाहीं तद्वतच परलोकीं सूक्ष्म देहानें त्याला स्थूल विषयांच्या वासना तृप्त करून घेतां येत नाहींत. तसेंच मनुष्याला आपल्या सुखदुःखात्मक कर्मांचें फल इहपरलोकीं भोगल्याशिवाय चुकवितां येत नसल्यामुळें सुखप्राप्तीकरितां व दुःख टाळण्याकरितां म्हणून मनुष्यानें स्वधर्माप्रमाणें वागलें पाहिजे. तुम्ही स्वस्त्रीला ताळ्यावर आणण्याला पाहातां; पण आपण स्वतः अधर्म काय करीत आहों याचा तुम्ही मुळींच विचार करीत नाहीं. तरी केलेल्या कर्मांचें फल तुम्हांलाहि भोगावेंच लागेल. तें कधींहि चुकणार नाहीं.

मृत्यूनंतर जड देह गेला तरी जीवाची वासना मरत नसल्यामुळें परलोकांत त्याला वासनादेहानें राहावें लागतें. तेथें त्याला विषयांची आठवण क्षणोक्षणीं होत असते व स्थूल सृष्टींतले स्थूल विषयहि त्याला प्रत्यक्ष दिसत असतात; पण ते जडविषय भोगण्याला तेथें त्याला जड शरीर नसल्यामुळें त्याला असह्य दुःख होतें. त्यालाच समजल्या जाणाऱ्या यमयातना म्हणतात.

येथें म्हणजे इहलोकींच जड देह शाबूत असतां वासना तृप्त झाली

नाहीं तर मनुष्य अंथरुणावर कसा तडफडत पडतो याचा अनुभव प्रत्येक मनुष्याला केव्हां ना केव्हां तरी येतोच. म्हणून जास्त स्पष्टीकरण करीत बसण्याचें कारण नाहीं. इहलोकीं दुसऱ्या दिवशीं तरी ती कामना तृप्त करून घेण्याचा प्रयत्न करतां येतो व कधीं कधीं ती तृप्त करूनहि घेतां येते; पण परलोकीं जड देहच नसल्यामुळें मनुष्याची वासनाच त्याला कुंभारीण माशीसारखी तेथें सारखी टोंचीत असते. ती टोंचणी फार असह्य असते म्हणून त्याला यमयातना म्हटल्या आहेत. तेव्हां त्या खोट्या आहेत अशी धर्माची टर उडवीत बसणें सुशिक्षित मनुष्याला तरी लांछनास्पद आहे.

हल्लींचे जडवादी पुनर्जन्म व परलोक मानीत नसले व तेंच आपणांला खरें वाटत असलें तरी कायद्याच्या अज्ञानानें जशा येथील शिक्षा चुकत नाहींत तद्वतच परलोक दिसत नसला किंवा प्रत्यक्ष दाखवितां येत नसल्यामुळें कोणी तो मानीत नसला तरी तेथील शिक्षा चुकणार नाहींत. म्हणून उगाच धर्माची टवाळी करीत बसणें तुम्हांला व सर्वांनाच घातुक आहे.

आपण म्हणतां तें सर्व ठीक आहे किंवा असेलहि; परंतु प्रस्तुतच्या यांत्रिक युगांत बुद्धिवादी मनुष्याला हें पटण्यासारखें नाहीं, तर हा विषय प्रत्यक्षांत किंवा युक्तिवादानें म्हणजे कार्यकारणपद्धतीनें पटवून देतां आला तर तो ऐकण्याची आपली इच्छा आहे अशी आमच्या श्रोत्यानें विनंती केल्यावरून प्रस्तुत व्यवहारांतून ज्याचा उपयोग करून घेतां येईल असें स्वधर्मांचें स्पष्टीकरण आम्हीं आमच्या दोन्ही पुस्तकांतून चांगलें विशद केलेलें असल्यामुळें तें आपणांस कळावें म्हणूनच तीं पुस्तकें मीं आपणांस वाचण्याविषयीं सुचविलें होतें. पण

ते घडलें नाहीं. म्हणून तेंच मी आतां आपणांस थोडक्यांत सांगण्याचा प्रयत्न करतों.

## विश्वधर्माचें विशेष स्पष्टीकरण

विरुद्ध संस्कृतीच्या सहवासामुळें व त्यांच्या ( इंग्लिशांच्या ) विशिष्ट योजनेमुळें आर्यसंस्कृति जशी अधोगतीला गेली आहे, तद्वतच मराठी भाषेची अभिवृद्धि झाली असली तरी त्यांच्या जडवादी शिक्षणामुळें मराठी भाषेंतील इतर शब्दांची फारशी नसली तरी त्यांतील धर्म आणि ईश्वर ह्या दोन शब्दांची फारच अधोगति झाली आहे. याचा ऊहापोह पूर्वीं झालाच आहे; तरी पण समजुतीचा घोटाळा होऊं नये म्हणून त्या शब्दांचा पुन्हां एकदां स्पष्ट खुलासा करतों.

धर्म म्हणजे प्रत्येकाच्या मनांत उभा राहणारा राष्ट्रधर्म किंवा ज्याचा जो धर्म असेल तो त्याचे मनांत उभा राहणारा धर्म. असा धर्म ज्याच्या त्याच्या डोळ्यांपुढें उभा राहात असतो; पण प्रस्तुत किंवा पुढें केव्हां तरी जारी होणारा विश्वधर्म म्हणजे सर्व मानवजातीचा धर्म होय. म्हणून त्याची व त्याशीं संबंध असलेल्या ईश्वर या शब्दाचीहि सरळ व्याख्या स्पष्ट शब्दांत सांगणें जरूर वाटतें.

धर्म—धर्म म्हणजे हरएक मानवी जीवानें इतर जीवांशीं आत्मौपम्य बुद्धीनें वागण्याची नीति—धर्म किंवा नियम—होय.

ईश्वर—ईश्वर म्हणजे सर्वव्यापी व सर्वसाक्षी परमात्मा. मग त्याला कोणी कोणत्याहि नांवानें, रूपानें किंवा कसाहि ओळखो. सर्व जगांत ईश्वर एकच.

भारतीय तत्त्वज्ञान व त्यावर आधारलेला विश्वधर्म याचें यथातथ्य ज्ञान होण्याची ज्याला गरज असेल त्यानें त्याकरितां प्रथम सराव नसेल

तर घटका-अर्धी घटका तरी स्वस्थ बसण्याचा प्रथम सराव करावा म्हणजे पुढील विवरण बुद्धीला पटण्यासारखें शब्दज्ञानानें व प्रत्यक्षांतहि पटवून घेतां येईल.

जें आहे तें नाहीं म्हणतां येत नाहीं व जें नाहीं त्याचें अस्तित्व शब्दज्ञानानें सिद्ध करतां येणार नाहीं. म्हणून 'जें कार्यांत दिसेल तें कारणांत असलेंच पाहिजे' हा बुद्धीला पटण्यासारखा जगन्मान्य सिद्धान्त विचारी मनुष्यानें सदैव ध्यानांत ठेवला पाहिजे. याला अध्यात्म-शास्त्रांत सत्कार्यवाद असें म्हणतात.

आतां आपण श्रोता व वक्ता म्हणून एकमेकांना प्रत्यक्ष दिसत आहों. म्हणजे कार्य दिसत आहे त्या अर्थीं आपण पूर्वीं होतों, सध्यां आहों व पुढेंहि असूं. तद्वतच आपला उत्पन्नकर्ता ईश्वर प्रत्यक्षांत दिसत नसला तरी त्याचें कार्य जें जगत् तें प्रत्यक्ष दिसत आहे त्या अर्थीं तो होता व आहे व त्या जगताचेच अंश आपण प्रत्यक्षांत दिसत आहों, त्या अर्थीं आपण व आपल्यांतील ईश्वर अप्रत्यक्षांत आहे असें सिद्ध होतें. तो सर्वव्यापी व सर्वसाक्षी असल्यामुळें तो कोठें नाहीं असें ठिकाण नाहीं. तद्वत् त्याला कळत नाहीं असेंहि कांहीं नाहीं. तो एकीं एकच आपला जीव व देह झाला आहे तद्वतच सर्व जगहि झाला आहे.

जगांतील परमात्मा ( परमेश्वर ) एकच असला तरी द्रष्टा व दृश्य अशीं दोन मुख्य तत्त्वें प्रत्यक्षच अनुभवितां येत असल्यामुळें जीव, जगत्, ईश्वर, काल व कर्म यांचें ज्ञान पटवून घ्यावयाचें असेल तर तें द्वैतांत शब्दज्ञानानेंच प्रथम पटवून घेतलें पाहिजे; पण परमात्मा परमेश्वरच सर्व जग झाला असल्यामुळें म्हणजे परमात्म्याशिवाय जगांत दुसरें कांहींही नसल्यामुळें शास्त्रानें ठरविल्याप्रमाणें तो अद्वैत ( सदैकः

म्हणजे सदा एकच ) आहे. तेथें द्वैत म्हणजे वाचारंभण नाहीं हें लक्षांत ठेवूनच विषय समजून घेणारानें त्या ईश्वराला आपले ठिकाणींच पटवून घेतला पाहिजे. हातांतील आंगठीप्रमाणें एकानें तो दुसऱ्यास दाखवितां येण्यासारखा नाहीं. तेथें एक आणि दोन ही भाषाच नाहीं.

जीव, जगत्, ईश्वर, काल व कर्म यांचा मनुष्याशीं निकट व घनिष्ट संबंध आहे. त्यांचें ज्ञान त्याला पटवून घ्यावयाचें असेल तर त्याला निराळी प्रयोगशाळा नको व शास्त्रीय उपकरणेंहि नकोत. त्याचें शरीर हीच त्याची प्रयोगशाळा. त्यानें सुखासनीं स्वस्थ बसून आपला जीव म्हणजे त्याचें व्यक्त स्वरूप जें मन तें कोणतें मनोराज्य करीत असतें याचे अवलोकन सूक्ष्मपणानें करावें.

मनोराज्य अवलोकन करूं लागलें असतां मनोराज्य करणारें, मनोराज्य पाहाणारें व मनोराज्य बनणारें आपलें मनच असतें म्हणून मनच आपण असें सिध्द होतें; पण मन हें शरीराचाच एक भाग आहे असें जडवादी समजतात.तसेंच आपल्या शरीरांत जीव आहे म्हणून मनाचें व्यापार आपणांला समजतात म्ह न जीव म्हणजे आपण असें म्हटलें तर ईश्वराचें स्वरूप आपणाला दिसत नाहीं, तसेंच आपल्या जीवाचें स्वरूपहि आपणाला कळत नाहीं. देहाचें स्वरूप मात्र प्रत्यक्ष दिसतें म्हणून देहच मी असें जडवादी म्हणजे निरीश्वरवादी समजतात आणि म्हणूनच जगतांत किंवा देहाचे ठिकाणींहि ईश्वर नाहीं असें तें समजतात. पण जीव प्रत्यक्ष दिसत नसला किंवा दाखवितां येत नसला तरी तो देहांत नाहीं असें मात्र कोणताहि समंजस मनुष्य म्हणूं शकणार नाहीं. ईश्वराचें जगत् दिसत आहें म्हणून ईश्वर नाहीं म्हणतां येणार नाहीं. म्हणून यापुढें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, देहामुळें

जीव उत्पन्न होतो कीं जीवामुळें जीवाचा देह जन्माला येतो ? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे.

जडदेहामुळें जीव उत्पन्न होतो असें म्हणणें म्हणजे घरच घराला उत्पन्न करतें असें म्हणावें लागेल; पण तो शुद्ध वेडेपणा ठरेल. तसें न व्हावें म्हणून शास्त्रकारांनीं जीव म्हणजे मनुष्याची वासना बीजरूपानें सूक्ष्मांत ठेवणारा तो जीव व मन म्हणजे वासनेचें व्यक्त स्वरूप असें ठरविलें आहे व तसा अनुभवहि येतो. तसेंच दृश्य शरीराचे ठिकाणीं माझें शरीर असें म्हणणारा तो जीव व मनाचे व्यापार म्हणजे मनोराज्य ज्याला कळतें तो ईश्वरी अंश जीव म्हणजे ईश्वर व ह्या दोहोंलाहि ज्याचा आधार आहे तो आत्मा असें शास्त्रानें ठरविलें आहे व तसा अनुभवहि येतो.

वास्तविक पाहिलें तर जीव आणि ईश्वर दोन नाहींत. ( गीता १५–७ ) पण कोणाचेंच प्रत्यक्ष रूप दाखवितां येत नसल्यामुळें मनोराज्य अवलोकन करणारानें देहाचे ठिकाणीं सर्वांचा द्रष्टा किंवा साक्षी म्हणून जो कोणालाहि ओळखतां येतो तो ईश्वर; सर्व मनोराज्य उत्पन्न करून त्यावर प्रिय, द्वेष्य किंवा उपेक्ष्य असा अभिमान धरणारा तो जीव; सर्व मनोराज्य हें मनुष्याचें जगत्; मनोराज्य करणें हें मनुष्याचें कर्म. मनोराज्य करण्याला जितका वेळ लागतो तो काल किंवा सर्वांचा नाश करणारा तो काल असा काल शब्दाचा दुसराहि अर्थ आहे. त्यालाहि ईश्वर असें समजतात.

याप्रमाणें जीव, जगत्, ईश्वर, काल व कर्म यांचीं स्वरूपें मनुष्याला एका ठिकाणींच स्वस्थ बसून मनोराज्य अवलोकन करण्याची कला साधली तर आपोआप कळून येतात. म्हणून दिसणारा देह व जगत्

एवढेंच खरें मानणें हें अज्ञान किंवा खोटा आग्रह होय, असें कोणाहि संशोधकाला कळून येईल.

## मनोराज्याची विशिष्ट पाहाणी

क्रिया-प्रतिक्रिया (अॅक्शन व री अॅक्शन्) हा जगताचा स्थूलाप्रमाणें सूक्ष्मांतहि अबाधित नियम आहे. मनोराज्य करणें हें मनुष्याचें कर्म आहे आणि कर्माचें फल टळणें अशक्य आहे. म्हणून मनोराज्य करणारावर मोठी जबाबदारी आहे. शेतांत बाजरी पेरल्यावर किंवा कडू वेल लावल्यावर मग त्यापासून गव्हाची किंवा गोड फलाची आशा करणें जसें व्यर्थ आहे, तद्वतच दुसऱ्याच्या द्रव्याचा किंवा स्त्रीचा अभिलाष धरणें किंवा दुसऱ्याचें वाईट चिंतणें व खोटा आग्रह धरणें ही अनीति म्हणजे दुष्कर्में आहेत. तीं मनुष्याचे हातून नकळतच मनोराज्यरूपानें मोठ्या हौसेनें होत असतात; पण हीं दुष्कर्में आहेत, असें ज्याचें त्यालाहि कळत नाहीं म्हणून मनुष्याला त्याचें कांहीं वाटत नाहीं; पण मनोराज्य हें वासनारूपी बीज होत असल्यामुळें पुढें मनोराज्यरूपानें ती ती वासना वाढत जाते व सूक्ष्म देहांत क्षणोक्षणीं बदल करीत असते.

मनोराज्य हाच वासनालोक, मनोलोक किंवा परलोक समजावा. इंग्रजींत याला 'थॉट वर्ल्ड' म्हणजे विचारी जगत् असें समजतात. ह्याचा गुरुत्वाकर्षणासारखा आणखी एक नियम आहे. त्याप्रमाणें सजातिय सजातीयांकडे ओढलें जातें. (लाइक अट्रॅक्ट लाइक) या न्यायानें दुष्कर्मांचे विचार दुष्कर्मांकडे व सत्कर्मांचे विचार सत्कर्मांकडे ओढले जाऊन ज्याचे त्याचे ते ते विचार पुष्ट होत जातात. म्हणून सुसंगति असावी. तसलीं पुस्तकें वाचणें ही सुद्धां संगतीच. कुसंगती

असेल आणि खुनाची किंवा दुसरी कसलीहि भावना मनांत घोळत बसत असेल व तसल्याच वातावरणांत वावरत असून तसलेंच वाङ्मय वाचीत असेल तर मनुष्याच्या त्या त्या विचाराला तसलीच पुष्टी मिळून त्याचे हातून खुनासारखेंहि दुष्कर्म घडून येईल.

पति-पत्नीचे बाबतींत संशय उत्पन्न होऊन एकदां सूडबुद्धि उत्पन्न झाली म्हणजे पति, पत्नी व यार यांच्यांत पूर्वऋणानुबंधानुसार कोण कोणाचा खून पाडील किंवा कोण केव्हां फासावर चढेल याचा नेम नसतो; पण इहलोकींच्या शिक्षा चुकवावी म्हणून त्यांतील कोणीं एखाद्यानें आत्महत्या केली किंवा प्रेमाचे बाबतींतहि निराश होऊन किंवा दुसऱ्या कसल्याहि अन्य कारणास्तव कोणीं आत्महत्या केली तर त्याची स्थिति मात्र फारच शोचनीय होत असते. आपल्या मतें तो आपण सुटलों असें समजत असतो; पण ती आत्महत्याच त्याला क्रिया प्रतिक्रिया न्यायानें वासनालोकांमध्यें वासनारूपानें सारखी टोंचीत असते. कशी म्हणाल, तर तुमची सूडभावना जशी आज तुम्हांला सारखी सतावीत आहे तशी. ह्या मानसिक् यातना फार असह्य असतात. आत्महत्या करतांना दुःख व नंतरहि दुःखच; पण नंतर आपण दुःखांतून सुटूं असें वाटणें हा निव्वळ भ्रम होय. आज सुशिक्षित लोकांतहि अज्ञान आहे तें हेंच.

आत्महत्येनें स्थूल देह गेला तरी जीवाची वासना मरत नसल्या-मुळें वासनालोकांत त्याची वासनाच त्याला कुंभारीण माशीसारखी वरचेवर सारखी टोंचीत असते व ते वेग सहन करीत त्याला तेथें खितपत पडावें लागतें. एकादें अनुचित निंद्यकर्म हातून घडल्यावर तें जसें येथेंहि मनुष्याच्या मनाला सारखें खात असतें तसेंच हें समजावें.

यावरून मनुष्यावर त्याच्या मनोराज्याचीहि केवढी मोठी जबाबदारी

आहे हें विचारी मनुष्याला कळून येईल; पण सामान्य मनुष्यांना इतकें विचार करण्याचें ज्ञान नसतें. म्हणून ईश्वरानें मैथुनजन्य सृष्टि उत्पन्न केली त्या वेळींच विश्वधर्माची उत्पत्ति केली आहे. त्याचीं पांच मूलतत्त्वें असून त्यांवरच आधारलेले दहा अधर्म सांगितलेले आहेत. तें आचरणें म्हणजेच दुःखाचें बीज पेरून ठेवणें होय. तें आपण आपल्या घरीं स्वकुटुंबांतच रोजीं सारखें पेरीत असतों. तें मनुष्याला टाळतां यावें म्हणून तें दुष्कर्म म्हणजे ते दहा अधर्म कोणते याचें थोडेंसें जास्त स्पष्टीकरण करतों.

**पांच मूलतत्त्वें व दहा प्रकारचे अधर्म**—शिंदळकी, हिंसा व चोरी हे तीन कायिक, कटु ( अप्रिय ), खोटें, उणें व विसंगत बोलणें हे चार वाचिक आणि परद्रव्याभिलाष, दुसऱ्याचें वाईट चिंतणें आणि खोटा आग्रह हे तीन मानसिक असे दहा अधर्म म्हणजे दुष्कर्में आहेत.

व्यभिचार म्हणजे प्रत्यक्षच शिनळकी करणें असें नव्हे तर परस्त्रीविषयीं कसलेहि विचार घोळीत बसणें हाहि व्यभिचारच आहे. रागानें, लोभानें किंवा दुष्टाव्यानें दुसऱ्याचा प्रत्यक्ष खून करणें म्हणजेच हिंसा असें समजलें जातें; पण मनानें तसले विचार करीत बसणें हीहि हिंसाच समजावी. चोरी ही तर फारच घातुक आहे. आपले जिनसाची किंवा द्रव्याची कोणीं चोरी केली तर आपणांला जसें वाईट वाटतें तसेंच आपण दुसऱ्याची चोरी केली तर त्याला वाईट वाटत असतें. चोर चोरी करतांना दुसऱ्याचें दुःख तर जाणत नाहींच; पण त्या वेळींच तो दुसऱ्याचा ऋणकरी होत असतो हेंहि त्याला कळत नाहीं. केवढें हें गाढ अज्ञान ! ! सुशिक्षित चोरांनीं तरी याचा फार विचार करावा.

शिंदळकी, हिंसा व चोरी या तीन कायिक अधर्मांपैकीं कोणताहि

एकादा अधर्म जरी प्रत्यक्षांत घडला तरी ते तीनहि एकमेकांचे साह्यकारी असल्यामुळें तीनहि अधर्म आपोआपच घडून येतात.

नुसता शिनळ्कीचाच विचार केला तरी ती संवय एकदां मनुष्याला लागली म्हणजे द्रव्य जवळ नसेल तर चोरी करावी लागते. चोरीच्या कामांत किंवा प्रत्यक्ष व्यभिचारांत तो दुसऱ्याची हिंसा करतो किंवा दुसरा त्याची हिंसा करतो व वेळीं एकमेकांचे खूनहि पडतात किंवा त्यांतून कोणी निभावला तरी प्रत्येकजण इतरांचें बरेंवाईट चिंतींत असतो; पण आपणांला खरें दुःख देणारा कोण तें त्याला समजत नाहीं.

एवंच कांहीं झालें तरी शिनळकी, हिंसा व चोरी हे तीन किंवा यांतील एखादा कायिक अधर्म जरी मनुष्याचे हातून घडला तरी त्याचा परिणाम जें दुःख तें भोगल्याशिवाय संपत नाहीं. उलट या कायिक कर्माचें जें फळ तयार होतें तें मृत्यूसमयीं शिल्लक राहिलें तर तें भोगण्याकरितां दुसऱ्या जन्माचें वासनारूपानें बीज होऊन बसतें.

पुढील जन्मीं या बीजाला जर कुसंगतीचें कायिक, वाचिक किंवा मानसिक खत मिळत गेलें तर जशास तसें फल मिळून तें भोगल्याशिवाय संपणार नाहीं व मनुष्यजन्मांत तर जडसृष्टीप्रमाणें जेवढ्यास तेवढीच प्रतिक्रिया होऊन ती संपत नसल्यामुळें व त्यांत वाचिक व मानसिक क्रियेची क्षणोक्षणीं आठवण होऊन भर पडत असल्यामुळें कर्मफल भोगूनहि संपत नाहीं. म्हणून मनुष्याचे मागें जी एकदां संसृति म्हणजे जन्ममरणपरंपरा लागली आहे तिचा म्हणजे सुखदुःखपरंपरेचा अंतच होत नाहीं.

ह्या सुखदुःखपरंपरेचा अंत होऊन मनुष्यानें आपल्या पूर्व अविनाशी व आनंददायी पदाला जाऊन मिळावें म्हणून ईश्वरानें

त्याला कर्मस्वातंत्र्य दिलें आहे. त्याचा मनुष्यानें योग्य उपयोग करावा म्हणून धर्माची उत्पत्ति झाली आहे व म्हणूनच धर्मानें सांगितलेले हे कायिक अधर्म तरी मनुष्यानें टाळण्याची शिकस्त करावी.

## सूडभावना कशी नष्ट होईल ?

प्रश्न—आतांपर्यंतचें हें आपलें विवेचन बुद्धीला पटण्यासारखें आहे; पण एकदां जी माझ्या मनांत खुनाची सूडबुद्धि उत्पन्न झाली आहे ती फलद्रूप झाल्याशिवाय पुढील दुःखाचा कितीहि विचार केला व कोणीं कांहीं सांगितलें तरी दुसरें कांहीं मनांत येतच नाहीं तर ती सूडभावना कशी जाईल ?

उत्तर—ह्या लोकीं आपण जडदेहानें जें बरें–वाईट कर्म करतों त्याचें फल भोगल्याशिवाय कालत्रयींहि चुकणार नाहीं. म्हणून कोणतेंहि कायिक कर्म प्रत्यक्षांत करतांना तरी फारच खबरदारी घेतली पाहिजे आणि त्याकरितांच मनुष्याला कर्म स्वातंत्र्य व विचार-स्वातंत्र्यहि मिळालें आहे.

वासनेचें बीज परिपक्क होऊन प्रत्यक्ष कर्म झाल्यावर तें बरें-वाईट कोणत्याहि प्रकारचें असो आपलें फल दिल्याशिवाय संपत नसल्यामुळें तें भोगून सरल्याशिवाय गत्यंतरच नसतें. खून करण्याची सूडबुद्धि आपल्या मनांतच उत्पन्न झाली आहे; पण ती अजून परिपक्व झालेली नाहीं. म्हणूनच तुम्ही आमच्याकडे सल्ला विचारिण्याकरतां आला आणि म्हणूनच ती अजूनहि बदलण्यासारखी आहे.म्हणून ह्या वेळींच प्रयत्न करणें व तो सफल होणें शक्य आहे. नाहीं तर खून करून तुम्हीं आत्महत्या केली असती किंवा फासावर लटकून दुःखात खितपत

पडला असतां; परंतु तसें झालें नाहीं. म्हणून विचारानें ही आपत्ति ( सूड भावना ) अजूनहि टळण्यासारखी आहे.

वासना बीजरूपांत आहे तोंपर्यंतच चांगल्यावाईट विचारांचें खत घालून ती परिपक्व करणें विचारी मनुष्याच्या हातीं असतें. म्हणून " मन जाय तो जाना दे मत जाना दे शरीर." असें आमच्या गुरुमहाराजांचें निक्षून सांगणें आहे. अर्थात् हें सांगणें कुविचाराबद्दलच आहे. सुविचाराकडे जो एकदां वळला तो उन्नतीच्या मार्गाला लागला म्हणून समजावें. महाराज म्हणत, " सर्व कांहीं संगतीवर अवलंबून आहे. म्हणून कुकर्माकडे मन जात असेल तर आपणांला कुसंगती आहे. मग ती प्रत्यक्ष मनुष्याची असो, वाङ्मयाची असो, जड वस्तूची असो किंवा नुसती एकांताची असो. तिचा एकदम त्याग करावा हें उत्तम; परंतु मानसिक त्याग असल्याशिवाय कायिक त्याग व्यर्थ आहे. तसा त्याग करण्यापेक्षां संसारांत राहणाऱ्या मनुष्यानें प्रथम आपली वासना वरचेवर कशाकडे धांव घेत आहे तें स्वस्थ बसून शोधून काढावें. ती वासना जर वरतीं सांगितलेल्या अधर्माकडें म्हणजे दुष्कर्म करण्याकडे धांवत असेल तर असलें कर्म करून आपण मिळवणार काय व त्याचा परिणाम काय याचा प्रथम विचार करावा. असा विचार करतांना आपणांला मिळणार काय याकडेच मनुष्याचें प्रथम लक्ष जाते व आपली इच्छा पूर्ण होणारी आहे असें दिसतांच तो प्रत्यक्ष कर्म करण्याला सुरुवात करतो; पण त्याच्या परिणामाकडे त्याचें लक्ष जात नाहीं म्हणून फसतो व पुढें जास्तच संकटांत पडतो. म्हणून प्रत्यक्ष कर्म करतांना परिणाम सुखदायी होणारा असेल तरच तें कर्म करावें. केवळ तात्पुरत्या व क्षणिक सुखाकडे लक्ष देऊन कोणतेंहि अधार्मिक कर्म करूं नये. तरच संसार सुखदायी

होऊं शकेल. नाहीं तर दुःखपरंपरा वाढत जाऊन एखादें घोर कृत्य हातून घडल्याशिवाय राहाणार नाहीं.

आपला घोर विचार अजून बीजरूपांत आहे तोंपर्यंतच तो सुविचारानें व सुसंगतीनें बदलण्यासारखा आहे. एकदां विचार परिणत झाला म्हणजे मग कोणचांहि इलाज चालणार नाहीं. म्हणून "दहा मोज आदी तुला राग फार। जयी येतयां हा असे सद्विचार." याचा विसर पडूं न देतां परिणामाचा मनुष्यानें प्रथम विचार करणें व सुबुद्धीकरतां ईश्वर भक्ति, जी साधेल ती सुरू करणें हाच त्या अधर्मापासून परावृत्त होण्याचा सदुपाय होय. निदान हरिनामस्मरण सुरू करणें हा तर बिनखर्ची उपाय आहे.

आतां तुम्हीं आपल्यासंबंधींच जास्त विचार केला तर तुमची उत्कट इच्छा सफल होतांच तुम्हांला अत्यानंद होईल व कृतकृत्यताहि वाटेल; पण त्याच्या परिणामाचा आपण विचार केला आहे काय? तुम्ही पकडले जाऊन फांसावर जाल किंवा ती शिक्षा चुकविण्याकरितां म्हणून तुम्हींच आत्महत्या केली तरी तुम्ही सुटलांत असें होणार नाहीं. तुम्हीं स्वतःचाच खून केला म्हणून तुम्ही परलोक मानीत नसलां तरी तेथील शिक्षा चुकणार नाहीं. म्हणजे तुमचें मनच तुम्हांला खात राहील. शिवाय जिचा खून केलात ती उलट तुमचा खून पाडण्याकरतां जन्मोजन्मीं टपून बसलेली असेल. म्हणजे मानसिक कर्म विचारानें बदलतां येईल; पण कायिककर्म एकदां झालें म्हणजे त्याचें फल इहपरलोकीं भोगल्याशिवाय चुकणार नाहीं. म्हणून हा घातुक विचार सोडून द्या. अजून तुमच्या हातांत आहे, हें पुन्हां मी आपणाला बजावीत आहें. केवळ क्षणिक सुखाकरतां मनुष्यजन्माची हानि करून घेऊं नका. आत्महत्येनें मनुष्य सुटतो असें म्हणणें म्हणजे अंगावरील कोट काढून ठेवला म्हणजे

अंगांतील रोग गेला असें म्हणण्यासारखें गाढ अज्ञान होय. त्यामुळें क्षुल्लक कारणाकरतां सुद्धां मनुष्य खून करण्यासहि कचरेनासा झाला आहे.

## मन आणि बुद्धि

प्रश्न---आपण म्हणतां तें अगदीं खरें आहे; पण खुनाची भावना मनांतून दूरच होत नाहीं त्याला काय करणार ? आणि ती जवळ असती तर तें घोर कर्म खरोखरच घडलेंहि असतें. म्हणून ही दुष्ट भावना दूर कशी होईल तें कृपा करून सांगा ?

उत्तर---आपण सुशिक्षित आहों, शहाणे आहों. परलोक आणि परलोकांतील शिक्षा, ईश्वर आणि ईश्वरी शिक्षा, ईश्वरभक्तीनें संकटें नाश पावतात वगैरे हें सर्व थोतांड आहे अशी तुमची समज होऊन बसल्यामुळें आमचें म्हणणें तुम्हाला पटत असलें तरी तुमची बुद्धि तुम्हांला आवरून धरील इतकी खंबीर झालेली नाहीं. व्यसनी पुरुषापुढें जसें स्त्रीचें किंवा सबळापुढें जसें दुर्बळाचें कांहीं चालत नाहीं, मान वांकवावीच लागते तसें तुमच्या मनापुढें तुमच्या बुद्धिचें कांहीं चालत नाहीं. हा सर्व हल्लींच्या शिक्षणाचा व वाङ्मयसंपत्तीचा परिणाम आहे. ज्यानें मनाच्या षड्विकारांवर ताबा राहात नाहीं तें खरें शिक्षण नव्हे. जें शिक्षण बुद्धीचा विकास करून मनुष्याला कार्यक्षम व प्रबळ म्हणजे करारी बनवील तेंच खरें शिक्षण समजावें. ज्याचें शिक्षण बिघडलें, चिमणाचिमणीच्या गोष्टी व सत्यकथा यांशिवाय ज्याला दुसरें वाचन नाहीं तो अनीतीकडे चालला असें समजावें. आर्थिक संपत्तीपेक्षां वाङ्मयसंपत्तीचें महत्त्व फार आहे. आर्थिक संपत्तीला जर दैवी संपत्ती वाढविणाऱ्या वाङ्मयाची जोड नसेल तर मन निश्चयी आणि सदाचारी बनणार नाहीं. असो.

बुद्धि प्रबळ होण्याला मनुष्यापुढें कांहीं तरी ध्येय असावें लागतें. तें ध्येय पुढें असलें म्हणजे मनुष्य प्रयत्नशील बनतो व त्यालाच त्यानें ईश्वरभक्तीची जोड दिली तर त्याला अनुरूप असे प्रयत्न होऊन त्याची त्या कामांत फत्ते होते. ईश्वरभक्ति म्हटली म्हणून कचरूं नका. आपण कर्म करण्याला पूर्ण स्वतंत्र नाहीं एवढी जागृति असली तरी पुरे आहे; पण बुद्धि निश्चयी होऊन ती सत्कर्मांकडे वळण्याला मात्र ईश्वरी साहाय्य पाहिजे हें विसरतां कामा नये. नाहीं तर कामुक असलेली बुद्धि भलत्याच कामाकडे खर्च होऊन अनर्थ उत्पन्न करील व वेळीं स्वतःचाच घात करून घेईल. म्हणून ईश्वर किंवा ईश्वरी शक्तीचें नांवहि नसून ज्यांत विषयासक्ति वाढविणाऱ्या गोष्टींची चंगळ असेल अशा वाङ्मयाची संगत आपण प्रथम एकदम सोडून द्या व भारत-भागवतासारखे ग्रंथ किंवा थोर व वीर्यशाली सत्पुरुषांचीं चरित्रें वाचा म्हणजे थोर पुरुष प्रसंगाला अनुसरून नीतिधर्म न सोडतां कसे वागले व धर्मपालनाकरितां निश्चयानें त्यांनीं किती हाल सोसले किंवा ध्येयसिद्धीकरितां त्यांनीं कसे अचाट प्रयत्न केले तें ध्यानांत येईल व बुद्धि प्रबळ होऊन तुमचें मन क्षुद्र व क्षणिक सुखाकडे धांवणार नाहीं, तुमचे हातून अधर्म घडणार नाहीं, प्रपंचहि सुखाचा करून घेतां येईल व परिणामीं राष्ट्रहि वैभवशाली कराल.

मागें सांगितलेंच आहे तरी पुन्हां सांगतों, हा प्रपंच दुःखद असला तरी तो सुखाचा होऊं शकेल; पण प्रपंच नेटका कसा करावा व ध्येय काय असावें तेंच प्रथम समजलें पाहिजे. प्रस्तुतच्या प्राप्त परिस्थितींत मनुष्यानें प्रथम मन आवरण्यास शिकलें पाहिजे. तें होत नसेल तर दुःखांतून सुटका होणें अशक्य आहे. मनुष्य उलट अधर्माचरण करून अधोगतीला जाईल.

पुन्हां सांगतों. प्रपंचांत द्रव्य, दारा आणि विद्या हीं सुखाचीं मुख्य साधनें असून यांपासून सुख किंवा दुःख किती मिळणार हें सर्वसाधारण-पणें ठरून तशा परिस्थितींनच मनुष्य जन्माला येतो. त्यालाच प्रारब्ध असें म्हणतात. म्हणून तें जसें असेल तसें तें मिळणारच आहे व आपण नको म्हटलें तरी तें टळत नसतें. तें सुखदायी असेल तर मनुष्य कशाचाच विचार करीत नाहीं; पण सर्वांनाच तें त्यांच्या इच्छेप्रमाणें मिळणें शक्य नसल्यामुळें प्रपंचांत जेव्हां मन विरस करणारे प्रसंग येतात, तेव्हां मनुष्य क्षणोक्षणीं खिन्न, उदासीन व दुःखी होत असतो व तसें होण्याला जो प्रत्यक्ष कारणीभूत झालेला दिसेल तोच आपल्या दुःखाचें कारण आहे असें समजून त्याच्याशीं तो तसाच शत्रुत्वानें वागूं लागतो; पण कुटुंबसंस्थेंत वरील तीन गोष्टींत तरी हें सर्व आपल्याच पूर्वकर्मांचें फल आहे हें तो विसरतो म्हणजे त्याच्या तें लक्षांतच येत नाहीं. येथेंच मनुष्याची मोठी चुकी होत असते. अशा वेळीं जशास तसें वागणें अपरिहार्य असलें किंवा वेळीं कर्तव्यहि असलें तरी तसें करणें निरर्थक आहे. कारण तसें तें होणार हें ठरलेलेंच होतें. त्याबद्दलचें पूर्वकर्म पूर्वींच होऊन गेलेलें असतें. तर त्यांत आतां आपल्याच मनाप्रमाणें बदल कसा होईल? सबब त्यांत बदल करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे उलट खातेबाकी वाढवण्यासारखें होईल. म्हणून अशा वेळीं मन आवरण्यास शिकावयाचें म्हणजे पूर्वींच्या दुष्कर्मानें आजचा हा दुःखद प्रसंग ओढवला आहे तर त्याची तशीच प्रतिक्रिया करणें म्हणजे दुष्टाव्यानें दुष्टावा वाढविण्यासारखें होईल; असें समजून प्रपंचांत आपल्या कुटुंबीयांत तरी असले प्रसंग पुन्हा येऊं नयेत म्हणून ते सहन करावे व पुढील सुखप्राप्तीकरतां म्हणून आपणच आपल्या मनुष्यांना क्षमा करावी व त्यांचेवर प्रथम आपणच प्रेम

करण्यास सुरुवात करावी व प्रेमानें त्यांना सुमार्गाला लावावें. त्यांना सुमार्गाला लावण्याकरतां व वेळीं धर्मपालनाकरतांहि धर्माला मुरड घालावी; पण कर्तव्य म्हणूनहि त्यांना शत्रूप्रमाणें शिक्षा करणें म्हणजे आपलेंच दुःख वाढविण्यासारखें आहे. शिक्षेपेक्षांहि प्रेमाच्या शब्दानें मनुष्य स्वखुषीनें धर्म पाळतो; परंतु प्रस्तुतच्या शिक्षणानें आपल्या घरांतहि आपणाला धर्म कोणता आणि अधर्म कोणता तेंच समजेनासें झालें आहे. उलट घरांतील लहान-मोठीं व बेजबाबदार माणसेंहि आपण करतों तें सर्व बरोबर, आपणांला सर्व कळतें, जुन्या कल्पना आतां कुचकामाच्या आहेत अशा भावनेनेंच वागत असतात. म्हणून प्रपंचांत निदान जाणत्या व सुशिक्षित मनुष्यांनीं तरी प्रथम संयमानें म्हणजे मन आवरून थोर मनानें वागण्यास शिकलें पाहिजे. त्यांत आपला पक्ष कमी पडून वेळीं मानहानी झाली तरीहि ती सहन करावी. रागानें लाल होण्यापेक्षां सहनशीलतेनें शील वाढत जातें व धन्यताहि वाटूं लागते.

याप्रमाणें वागलें असतां दुःखद वाटणारा प्रपंचहि सुखाचा करतां येणें शक्य आहे. म्हणून तुम्ही सध्यां अज्ञातवासांत आहां तसेंच राहा आणि सूडबुद्धि मनांत आली तर जो घोर परिणाम वरती सांगितला आहे तो मनांत आणा म्हणजे सूडबुद्धि मागें पडेल व पात्रांत विष आहे असें समजतांच मनुष्य जसा सुग्रास अन्नहि टाकून उठतो तसे तुम्ही घोर कृत्यापासून परावृत्त व्हाल; पण अशी आठवण येण्यालासुद्धां ईश्वराला हात जोडून तसें होण्याकरतां सांजसकाळ व रिकामा वेळ सांपडेल तेव्हां सारखी त्याची करुणा भाकीत राहिलें पाहिजे; तरच तुमची ही सूडबुद्धि परती सारतां येईल. नाहीं तर दुष्परिणाम समजत असूनहि मन ऐकणार नाहीं.

## धर्म व ईश्वर

प्रश्न—कळतें पण वळत नाहीं असें म्हणतात तेंच खरें. आपणांजवळ खरें बोलावयाचें म्हणून मी अगदीं अंतःकरणापासून पुन्हां सांगतों. ईश्वर आणि धर्म यांवर माझा अजूनहि विश्वास बसत नाहीं. आपणांजवळ असतां आपलें म्हणणें पटतें; पण घरीं गेल्यावर पुन्हां सूडबुद्धि मनांत थयमान करूं लागते; तर जें काय प्रत्यक्षांत पटवून देतां येईल असें पटवून देतां येण्यासारखें जें कांहीं असेल तें कृपा करून सांगा ?

उत्तर—आपल्या मनांत सूडबुद्धि वावरत आहे तोंपर्यंत आणखी कितीहि सांगितलें तरी त्याचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. तुमच्या पत्नीनें जारकर्म केलें असेल तर त्याचें प्रायश्चित्त तिला तिच्या याराकडून किंवा दुसऱ्या कोणाकडून तरी परस्पर मिळेल. तिला सुधारण्यापेक्षां तुम्ही प्रथम आपल्याला सुधारण्याकरतां तुम्ही प्रस्तुत आहां तसेच अज्ञातवासांतच राहा व ती मेली असें समजा. तरी मन ऐकणार नाहीं. म्हणून सूडबुद्धि मनांत आली कीं मनानेंच पंढरपूरला जा व एक सुंदरसा सुवासिक फुलांचा हार विठोबाचे गळ्यांत घालून त्याचे चरणांवर मस्तक ठेवा व “ मी आपणांला शरण आहें. माझ्या मनांतील सूडबुद्धि घालवा असें म्हणून त्याला वरचेवर नमस्कार करा. ” असें करतां आलें तर सूडबुद्धि खात्रीनें जाईल; पण हें दिसतें तितकें सोपें नाहीं. अशी बुद्धि होण्याला निदान आपल्या बाबतींत तरी हरिनामस्मरणाशिवाय दुसरा सोपा इलाज दिसत नाहीं किंवा मी आपणांला प्रथम तुम्ही मजकडे आलां त्या वेळीं सांगितल्याप्रमाणें मन कशांत तरी गुंतविल्याशिवाय मनांतील सूडभावना नाहींशी होण्याला दुसरा

इलाज नाहीं. हेंहि होत नसेल तर संकटनिवारणाचें एक साधन म्हणून आमचे महाराजांचें चरित्र वरचेवर वाचा व त्यांचीहि प्रार्थना करा व नंतर आणखी तीन महिन्यांनीं मजकडे या.

आपणांला वेळ सांपडला म्हणजे आतांपर्यंत जें मीं आपणांला सांगितलें त्याचें मनन करा. त्याला मदत व्हावी म्हणून मी आपणांला पुन्हां एकदां थोडक्यांत सांगतों.

परमात्मा परमेश्वर सर्वव्यापी व सर्वसाक्षी असून सर्व जगतांत तो अंतर्यामी रूपानें राहतो. इतकेंच नव्हे तर सर्व दृश्यादृश्य जगत् तोच झाला आहे. कसा म्हणाल तर आपला जीव, आपला देह झाला आहे तसा.

मनुष्य हा जगतांतूनच उत्पन्न झालेला असल्यामुळें मानवी जीव हाहि ईश्वरी अंश म्हणून ईश्वरच आहे; पण तो बाह्य विषयांवर प्रिय, द्वेष्य व उपेक्ष्य अशी भावना ठेवून त्यांपासून सुखाची इच्छा करूं लागला कीं तो जीव, जगतांतील विषयसुखाशीं केवळ साक्षीरूपानें म्हणजे निरपेक्ष बुद्धीनें व्यवहार करीत असला म्हणजे तो ईश्वर व ह्या दोन्ही भावना आपल्या मनाला ज्याच्या योगानें समजतात तो देहांतील आत्मा होय. जीव, ईश्वर व आत्मा हा एकीएक आत्माच आहे. पण जीवाला जड देहाची उपाधि लागली कीं, आपण ईश्वर आहों हें तो विसरतो व जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतो व सुखदुःख भोगीत असतो. त्यांतून सुटावें म्हणून धर्माची उत्पत्ति झाली आहे.

धर्म इजारींत नाहीं किंवा टोपींत नाहीं. तो तुमच्या विचारांत, उच्चारांत व आचरणांत आहे. आपलें आचरण धर्माप्रमाणें व्हावें म्हणून सर्वांचा द्रष्टा तोच ईश्वर समजावा व आपण जें जें कायिक, वाचिक व

मानसिक कर्म करतों तें त्याला कळतें हीं भावना जागृत असावी म्हणजे मनुष्य धर्मानें ( नीतीनें ) वागूं लागेल.

आपणांला अमुक असावें, तमुक नसावें अशी इच्छा धरणारा तो जीव, त्या इच्छेचें नियमन करणारा तो ईश्वर. तो आपल्या बुद्धींत वसत असून आपल्या कर्माप्रमाणें आपणांला कर्म करण्याची प्रेरणा करीत असतो म्हणून मनुष्यानें धर्मानें ( नीतीनें ) वागलें पाहिजे.

मनुष्य कर्म करण्याला स्वतंत्र असला तरी कर्मफलनियंत्रण त्याचें हातीं नाहीं. म्हणून ईश्वर नाहीं असें म्हणणें अज्ञान होय.

एवंच धर्माला व ईश्वराला न सोडतां धर्माचीं जीं पांच मूलतत्त्वें आहेत त्यांना धरून व दहा प्रकारचे अधर्म सांगितले ते टाळून मनुष्य प्रथम आपल्या घरीं म्हणजे प्रपंचांत नीतीनें वागेल तर हा दुःखदायक प्रपंचहि सुखाचा होऊं शकेल. अशी ही मानवनीति आहे.

पण तुम्ही तर स्वस्त्रीचाच खून करण्याला प्रवृत्त झालां आहां. खून करणें हेंच सुख असें तुमच्या मनानें घेतलें आहे; पण हिंसा हा पहिला मोठा अधर्म आहे आणि तीहि स्त्रीहत्या. तेव्हां तुम्ही स्वस्त्रीला ताळ्यावर आणण्यापेक्षां स्वतःचेंच मन आवरून आम्हीं सांगितलेलें साधन विश्वासानें म्हणजे श्रद्धेनें करा म्हणजे तुमची सूडभावना खात्रीनें नष्ट होईल. विश्वासाची पराकाष्ठा तीच श्रद्धा. जशी ज्याची श्रद्धा तसा तो होतो हाच सिद्धान्त. ईश्वर नाहीं म्हणणें हीसुद्धां श्रद्धाच. जो आहे म्हणेल त्याला आहे, नाहीं म्हणेल त्याला नाहीं. ॐ तत्सत् कृष्णार्पणमस्तु। शुभं भवतु। तथास्तु। भारतमाता की जय। जय हिंद !

# श्रीसद्गुरु रामानंद बीडकर महाराज यांचें चरित्र

आमचे गुरु श्रीरामानंद बीडकर महाराज यांचें चरित्र ३ री आवृत्ति ( १९५१ ) सालीं प्रसिद्ध केली. त्यासंबंधीं ता. १६-१२-५१ च्या केसरींत अभिप्राय आला आहे तो मननीय असल्यामुळें पुढें दिला आहे.

केसरी ता. १६-१२-५१—श्रीरामानंद बीडकर महाराज यांचें चरित्र—( ले. ल. ग. बापट २४५ शनवार पेठ, श्री बीडकर महाराज मठ, किं. रु. ६ ) ह्या ग्रंथाची ही तिसरी आवृत्ति प्रसिद्ध होत आहे. यावरून ह्या ग्रंथाची लोकप्रियता दिसून येते.

श्री बीडकर महाराजांनीं पूर्वीं केलेलीं भविष्यें खरी ठरलीं आहेत. " हे इंग्लिश लोक फटाकी न वाजतांच हिंदुस्थान सोडून जातील हीच आमची मदत समजा. " असें महाराज म्हणाले होते तें खरें ठरलें. स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यावरहि धर्माचें पुनरुज्जीवन झालें नाहीं तर अतिवृष्टि, अनावृष्टि, भूकंप, ज्वालामुखी, वादळें वगैरे अनिवार्य संकटें उत्पन्न होऊन लोक अति त्रस्त होतील. " हेंहि भविष्य खरें होत असल्याची प्रचीती येत आहे. शेवटीं लोक धर्माकडे वळतील व मग 'दानत' आली तरच हिंदु लोकांचें नष्टचर्य संपेल. व मग तेच सर्व जगाचे गुरु होण्यास समर्थ होतील. हे महाराजांचें तिसरें भविष्य खरें होणें हिंदू जनतेच्या श्रद्धेवर अवलंबून आहे.

असो. तिसऱ्या आवृत्तींत महाराजांचे एक शिष्य रावसाहेब ऊर्फ बाबा यांची त्रोटक माहिती छायाचित्रासह दिली आहे. पुस्तक संग्राह्य आहे.

---

# विचार-जागृति

सुख प्राप्तीकरतां प्रत्येक मनुष्याला काय करतां येण्यासारखें आहे व तें कसें करावें हें ह्या पुस्तकांत सांगितलें आहे. पृष्ठें ४०० किं. रु. ३. हीं पुस्तकें फारच थोडीं शिल्लक आहेत. पुढें याची किंमत चरित्राप्रमाणें वाढेल.

या पुस्तकासंबंधीं नामदार दादासाहेब खापर्डे आपल्या अभिप्रायांत म्हणतांत " आपलें सर्वच पुस्तक उत्तम साधलें आहे. त्यांतल्यात्यांत प्रकरण सातवें तर उत्तम लिहिलें असून इतकें संगतवार आणि सुसंबद्ध विवेचन इतर कोणत्याहि ग्रंथांत मी पाहिलें नाहीं. "

## आमच्याकडे मिळणारीं इतर पुस्तकें

# आत्म साक्षात्कार मार्गप्रदीप

म्हणजे श्रीगजानन महाराज नाशिक यांचें चरित्र.

आवृत्ति २ री, पृष्ठें ४२४ कि. रु. ३॥ साडेतीन फक्त

# आत्मप्रभा

( सोपे तात्त्विक विचार )

पृष्ठें १७६ कि. रु. २॥ अडीच

**श्रीविठ्ठलाचा कटाव** कि. २ आणे

**महाराजांचें अस्ति (स्थि) संकीर्तन** कि. २ आणे

**सुदैव की दुर्दैव व प्रयत्नाचें प्रावल्य** कि. २ आणे

ग्रंथ मिळण्याचा पत्ता—

ल. ग. बापट

श्रीबीडकर महाराज मठ

२४५ शनिवार पेठ, पुणें २.